रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १७ ◆ अंक ३३२
www.ramprahar.com
# राम प्रहर
गुरुवार, १९ जून २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२


## अंतरंग

‘इंग्रजीचा पुरस्कार अन् भारतीय भाषांचा तिरस्कार योग्य नाही’/२

२० लाख कमवण्याच्या नादात ५० लाख गमावले/३

टी-२० विश्वचषकाचे वेळापत्रक जाहीर!/८


## जेजुरीजवळ कारचा अपघात; सात ठार, पाच जखमी



**पुणे :** जिल्ह्यातील जेजुरी-मोरगाव रस्त्यावर स्विफ्ट कार आणि पीकअप टेम्पोच्या भीषण अपघाताची घटना घडली. या दुर्दैवी अपघातात एका महिलेसह सात जणांचा जागीच मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती आहे. जेजुरी मोरगाव रस्त्यावरील एका कंपनीसमोर बुधवारी (दि.१८) रात्री अपघात झाला. पुण्याहून मोरगावकडे जाणारी स्विफ्ट डिझायर कार जेजुरीकडून मोरगावकडे जात असताना श्रीराम ढाब्यासमोर पिकअप टेम्पोमधील साहित्य खाली करीत असताना जोरदार धडक दिली. येथील रस्त्यावरील एका कंपनी समोरील हॉटेल श्रीराममध्ये पीकअप टेम्पोमधील साहित्य उतरविण्याचे काम सुरू होते. त्यावेळी जेजुरीकडून इंदापूरकडे जाणाऱ्या कारने पीकअप टेम्पोला जोरदार धडक दिली. या अपघातात स्विफ्ट कारमधील पाच जण तर पिकअपमध्ये असलेल्या दोन जणांचा जागीच मृत्यू झाला.

# पालिकेच्या स्वराज्य वास्तूमुळे पनवेलच्या वैभवात भर पडेल

### आमदार प्रशांत ठाकूर यांचे प्रतिपादन

### मुख्यालयाच्या बांधकामाची पाहणी



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका नूतन मुख्यालयाच्या बांधकामाचा कामाचा दर्जा उत्तम असून कामाची प्रगती ही समाधानकारक आहे. या वास्तूमुळे पनवेलच्या वैभवातदेखील भर पडणार आहे, असे आमदार प्रशांत ठाकूर यांनी बुधवारी (दि.१८) येथे सांगितले.

पनवेल महानगरपालिका हद्दीतील नवीन पनवेल (प.) या भुखंडावर स्वराज्य-पनवेल महानगरपालिका मुख्यालय इमारतीचे बांधकाम सुरू आहे. त्या ठिकाणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देऊन कामकाजाची पाहणी केली. या वेळी माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी नगरसेवक नितीन पाटील, अनिल भगत, अजय बहिरा उपस्थित होते. शहर अभियंता संजय कटेकर यांनी मुख्यालयाच्या कामाची सविस्तर माहिती दिली.

या वेळी बोलताना आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले, पालिकेच्या नवीन वास्तूचे काम प्रगतीपथावर असून पनवेलवासियांच्या सेवेसाठी लवकरच सुसज्ज अशी पालिकेची वास्तू निर्माण होणार आहे. नवीन मुख्यालयात नागरिकांच्या सोयी सुविधांचा अधिक विचार करावा, असेही ते म्हणाले.

महापालिकेत नागरिकांची रोजची मोठ्या प्रमाणात वर्दळ असते. या दृष्टीने सार्वजनिक वाहतूकीचे थांबे, पार्किंगची सुविधा, स्वच्छतागृह, कॅफेटेरिया तसेच महासभा दालन, महापौर दालन, उपमहापौर दालन, स्थायी समिती दालन, सभागृह नेते दालन, विरोधी पक्षनेता दालन व दोन कॉफरन्स हॉल , समिती बैठक कक्ष तसेच आयुक्त दालन या सर्वांची माहिती घेऊन सूचना दिल्या. बांधकामानंतरच्या पुढील कामाबद्दलही त्यांनी माहिती घेतली. तसेच सर्व कामे विहित वेळेत संपूर्ण दर्जा राखून पूर्ण करण्याबाबत संबंधितांना सूचना दिल्या.

आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली महानगरपालिका मुख्यालय स्वराज्य इमारत ही नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाकडून पनवेलकडे येणाऱ्या रस्त्यालगत उभारली जात आहे.

पाहणीवेळी महापालिकेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. राजू पाटोदकर, कनिष्ठ अभियंता प्रतिक आंग्रे, आकाश गायकवाड, कंत्राटदार धर्मेश पटेल, श्री. जाने आदी उपस्थित होते.

# फक्त तीन हजारांमध्ये वर्षभर टोलमुक्त प्रवास

### ना. नितीन गडकरी यांची घोषणा

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

केंद्रीय रस्तेवाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी बुधवारी (दि.१८) सोशल मीडियावरील एका पोस्टद्वारे फास्टॅग बद्धलची घोषणा केली. वाहनचालकांसाठी लवकरच फास्टॅग आधारित वार्षिक पास सुरू होणार आहे. या नव्या योजनेंतर्गत वाहनधारकांना तीन हजार रुपयात वर्षभर (२०० ट्रीप) टोलमुक्त प्रवास करता येणार आहे. आगामी १५ ऑगस्ट २०२५ पासून ही योजना लागू होईल.

गडकरींनी आपल्या पोस्टमध्ये नमूद केल्यानुसार आगामी १५ ऑगस्टपासून सुरू होणारी ही पास केवळ गैर-व्यावसायिक खासगी वाहनांसाठी उपलब्ध असेल. पास सक्रिय केल्याच्या तारखेपासून एक वर्षासाठी किंवा २०० फेऱ्या पूर्ण होईपर्यंत (यापैकी जे आधी घडेल) वैध राहील.



वार्षिक पासमुळे देशभरातील राष्ट्रीय महामार्गांवरून सहज आणि किफायतशीर प्रवास करता येईल, असे गडकरींनी म्हटले आहे.

नवीन धोरण ६० किलोमीटरच्या परिघात असलेल्या टोलनाक्यांसंदर्भातील जुन्या समस्यांचे निराकरण करते आणि एकाच, परवडणाऱ्या व्यवहाराद्वारे टोल भरणे सुलभ करते. टोलनाक्यांवरील वेळ कमी करणे, वाहतूक कोंडीतून सुटका करणे आणि टोल प्लाझावरील वाद कमी करणे यासह लाखो खासगी वाहन मालकांना जलद आणि सुलभ प्रवासाचा अनुभव देणे, हा या वार्षिक पासचा उद्देश असल्याचे गडकरींनी स्पष्ट केले. इच्छुकांना ’राजमार्ग यात्रा’ या अधिकृत ॲपद्वारे हा पास ॲक्टिवेट करू शकतील.

### असा काढा पास

वार्षिक पास सक्रिय करण्यासाठी किंवा नूतनीकरणासाठी एक स्वतंत्र लिंक लवकरच हायवे ट्रॅव्हल ॲप आणि NH-I/MoRTH वेबसाइटवर उपलब्ध करून दिली जाईल. नागरिक ही लिंक सुरू झाल्यानंतर या अधिकृत ॲपद्वारे हा पास ॲक्टिवेट करू शकतील. तसेच राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण आणि रस्ते वाहतूक मंत्रालयाच्या वेबसाईट्सवरूनही पास मिळवता येईल.

## निवडक

### अरण्यऋषी पद्मश्री मारुती चित्तमपल्ली यांचे निधन

**सोलापूर :** पद्मश्री पुरस्काराने सन्मानित



अरण्यऋषी मारुती चित्तमपल्ली यांचे वयाच्या ९३ वर्षी बुधवारी निधन झाले. ३० एप्रिल २०२५ रोजी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते त्यांना पदमश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. चित्तमपल्ली यांनी वन खात्यात ३६ वर्षे सेवा केली आहे. २५ पेक्षा जास्त पुस्तके त्यांनी लिहिली आहेत.

### केदारनाथ मार्गावर भाविकांचा अपघात; दोघांचा मृत्यू

**केदारनाथ :** उत्तराखंडमधील केदारनाथ मार्गावर जाणाऱ्या काही भाविकांचा भीषण अपघात झाला, ज्यात दोन भाविकांचा मृत्यू झाला, तर तीन जखमी आहेत. ही घटना बुधवारी मध्यरात्री १२ वाजता घडली. केदारनाथला जाणारे काही लोक गौरीकुंड आणि रामबाडा दरम्यान जंगल चट्टी परिसरात थेट डोंगरावरुन खाली खंदकात कोसळले. यामध्ये दोघांचे मृतदेह काढले आहेत.

### रायगडात तीन पर्यटनस्थळांवर शासनाचा मनाई आदेश जारी

**रायगड :** माणगाव तालुक्यातील देवकुंड धबधबा, सिक्रेट पॉईंट व ताम्हिणी घाट व आजूबाजूच्या १ कि.मी. परिसरात १७ जून ते ३० सप्टेंबर २०२५ या कालावधीकरिता माणगाव उपविभागीय अधिकारी डॉ.संदीपान सानप यांनी प्रतिबंधात्मक मनाई आदेश जारी केला आहे.

(सविस्तर पान ७ वर..)

# भारताची संरक्षण क्षेत्रात मोठी झेप

### नवीन हायपरसॉनिक क्षेपणास्त्राची चाचणी अंतिम टप्प्यात

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताने संरक्षण क्षेत्रात एक मोठी झेप घेतली आहे. संरक्षण संशोधन आणि विकास संस्था (DRDO)द्वारे विकसित करण्यात आलेले नवीन हायपरसॉनिक क्षेपणास्त्र ET-LDHCM (Extended Trajectory Long Duration Hypersonic Cruise Missile) आता अंतिम चाचणीच्या टप्प्यावर असून, यशस्वी चाचणीनंतर भारत अमेरिका, रशिया आणि चीनसारख्या महाशक्तींमध्ये सामील होईल.

भारत आणि रशियाच्या संयुक्त प्रयत्नातून तयार झालेले ब्रह्मोस क्षेपणास्त्र हे आधीच जागतिक स्तरावर अत्यंत घातक आणि वेगवान क्षेपणास्त्र मानले जाते, मात्र ET-LDHCM हे पूर्णपणे स्वदेशी तंत्रज्ञानावर आधारित असून, याचा वेग ब्रह्मोसच्या तिप्पट म्हणजे



माच-८ (सुमारे ११००० किमी/तास) आहे. ब्रह्मोसचा वेग माच-३ (सुमारे ३६७५ किमी/तास) आहे.

ब्रह्मोस क्षेपणास्त्राची श्रेयस मर्यादा सुरुवातीला २९० किमी होती, जी आता ४००-४५० किमीपर्यंत वाढवण्यात आली आहे, परंतु ET-LDHCMची श्रेयस मर्यादा तब्बल १५०० किमी आहे. म्हणजेच हे क्षेपणास्त्र अधिक लांब अंतरावरील लक्ष्यांवर अत्यंत अचूकतेने प्रहार करू शकते. यात १००० ते २००० किलोग्रॅम वजनाच्या युद्धस्फोटक शस्त्रांसाठी क्षमता आहे आणि हे क्षेपणास्त्र पारंपरिक तसेच अण्वस्त्र युद्धस्फोटकांनी सज्ज असू शकते. (पान २ वर..)

### जागतिक महासत्ता म्हणून मिळेल बळ!

आजपर्यंत फक्त अमेरिका, रशिया आणि चीन यांच्याकडेच अशा उच्च-तंत्र क्षेपणास्त्रांची क्षमता होती. आता भारत हे तंत्रज्ञान विकसित करत असल्यामुळे, संरक्षण क्षेत्रात भारताची गणना जागतिक महासत्तांमध्ये होऊ शकते.

# पनवेलमध्ये भाजपतर्फे विकसित भारत संकल्प सभा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०४७ पर्यंत भारताला विश्वगुरू बनवण्याचे ध्येय समोर ठेवले आहे. हे उद्दिष्ट गाठण्यासाठी आत्तापासून ते २०४७ पर्यंतचा काळ हा अमृत काळ आहे. या अमृत काळात आपल्याला प्रत्येक पाऊल गतीने टाकत २०४७ पर्यंत आपला देश विश्वगुरू बनेल यासाठी सर्वांनी प्रयत्न करायचे आहेत, असे प्रतिपादन भाजपचे प्रवक्ते माधव गांगुर्डे यांनी संकल्प सभेत केले.

भारतीय जनता पक्ष, पनवेल शहर मंडळातर्फे विकसित भारत संकल्प सभा श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात आयोजीत करण्यात आली होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने ११ वर्षांचा कार्यकाळ पूर्ण केल्यानिमित्त देशाच्या विकासासाठी घेतलेल्या संकल्पांना जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी या सभेचे आयोजन करण्यात आले होते. सभेमध्ये केंद्र सरकारच्या विविध कल्याणकारी योजना, पायाभूत सुविधा विकास प्रकल्प आणि भारताला विकसित राष्ट्र बनवण्यासाठी आखलेल्या धोरणांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच केंद्र सरकारच्या सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास या मंत्रावर आधारित कामकाजाची माहिती देण्यात आली. (पान २ वर..)

# ‘एक्सप्रेस वे’वर भाताण बोगद्यात पोलिसांच्या वाहनांचा अपघात

### १८ पोलीस, १२ बांगलादेशी जखमी

**पनवेल, खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील भाताण बोगद्याजवळ बुधवारी (दि.१८) सकाळी मोठा अपघात घडला. मुंबई व नवी मुंबई पोलिसांकडून बांगलादेशी आरोपींना पुण्याकडे घेऊन जात असलेल्या ताफ्यातील सात ते आठ वाहने एकमेकांवर आदळली. या अपघातात १८ पोलीस कर्मचारी आणि १२ बांगलादेशी आरोपी जखमी झाले असून, यामध्ये एक जण गंभीर जखमी आहे. त्यांच्यावर एमजीएम रुग्णालय कामोठेत उपचार सुरू आहेत.



मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, सकाळी सुमारे सहा वाजण्याच्या सुमारास भाताण बोगद्यात एक कंटेनर अचानक रस्त्यामध्ये आडवा झाला. या कंटेनरमुळे वाहतुकीस अडथळा निर्माण झाला होता. (पान २ वर..)



# संत तुकाराम महाराज पालखीचे प्रस्थान

**पुणे : प्रतिनिधी**

टाळ, मृदंगाच्या तालावर आणि ज्ञानोबा माऊली-तुकाराम व ‘माऊली, माऊली’ असा जयघोष करीत डोक्यावर तुळशी वृंदावन व हातामध्ये दिंड्या पताका घेतलेले वारकरी,अशा भक्तिमय वातावरणात श्री क्षेत्र देहू येथून आषाढी वारीसाठी श्री संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याने श्री क्षेत्र पंढरपूरकडे दुपारी प्रस्थान ठेवले. पालखी सोहळ्यात वारकरी आणि भाविक मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत. या वेळी वरुणराजाने हजेरी लावली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी श्री क्षेत्र देहू येथील जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराज संस्थान मंदिरात श्री विठ्ठल-रखुमाई मंदिर आणि श्री संत तुकाराम महाराज मंदिर, श्रीराम मंदिरात दर्शन घेतले. त्यांच्या हस्ते मंदिरात श्री गणेश पूजन, कलश पूजन, पाद्य पूजन करून पालखीची विधिवत प्रस्थान पूजा व आरती झाली.

केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, खासदार सुनेत्रा पवार, खासदार श्रीरंग बारणे, आमदार सुनील शेळके, विजय शिवतारे, अमित गोरखे, आमदार उमा खापरे, आमदार शंकर मांडेकर, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, श्री संत तुकाराम महाराज संस्थानचे अध्यक्ष ह.भ.प. जालिंदर मोरे, पालखी सोहळा प्रमुख ह.भ.प. गणेश महाराज मोरे, ह.भ.प वैभव महाराज मोरे, ह.भ.प दिलीप महाराज मोरे, विश्वस्त ह.भ.प. विक्रमसिंह मोरे, ह.भ.प.उमेश महाराज मोरे, ह.भ.प. लक्ष्मण महाराज मोरे आदी उपस्थित होते.




# इंग्रजीचा पुरस्कार अन् भारतीय भाषांचा तिरस्कार हे योग्य नाही -मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्य सरकारने तत्काळ हिंदीची सक्ती मागे घ्यावी, असा इशाराही मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी दिला होता. त्यानंतर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावर उत्तर दिले.



हिंदी आधी अनिवार्य होती, पण आता ती अनिवार्यता काढून टाकली आहे. आता मुलांना कुठलीही तिसरी भारतीय भाषा शिकता येईल. नव्या शैक्षणिक धोरणात मातृभाषा अनिवार्य आहे. त्यासोबत इतर दोन भाषांपैकी एक भारतीय भाषा असायला हवी. आपल्याकडे स्वाभाविकपणे इंग्रजी स्वीकारली जाते, त्यासोबत हिंदी म्हटले होते. कारण हिंदीचे शिक्षक उपलब्ध होतात, पण आता ती अनिवार्यता काढलेली आहे. कुठलीही भारतीय भाषा तिसरी भाषा म्हणून शिकता येईल. आज केलेल्या बदलात हिंदीची अनिवार्यता काढून कुठलीही तिसरी भाषा शिकण्याचा पर्याय दिलेला आहे. भारतीय भाषा इंग्रजीपेक्षा चांगल्या आहेत, पण इंग्रजीचा पुरस्कार अन् भारतीय भाषांचा तिरस्कार हे योग्य नाही, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शैक्षणिक धोरणातील हिंदीचा समावेश यावर मत व्यक्त केले.

नव्या शैक्षणिक धोरणाने मराठीला वैश्विक भाषा बनवली आहे. मराठी अनिवार्यच असणार आहे. हिंदीला पर्याय असेल. माझी राज ठाकरेंशी चर्चा झाली. त्यांचा आग्रह आहे की, दोनच भाषा हव्यात. पण मी सांगितले की देशात तीन भाषांचे सूत्र आहे, महाराष्ट्र दोन भाषांच्या सूत्रावर जाऊ शकत नाही. आपली भाषा शिकत असताना एखादी भारतीय भाषा शिकली तर त्यात गैर काय? आपल्या भाषेला डावलले गेलेले नाही. मुले नवी भाषा शिकतील तर अधिक ज्ञान मिळवतील. राज यांचा आग्रह असला तरीही देशभरातील जाणकारांनी शैक्षणिक धोरण तयार केलेले आहे.

# अल्पावधीतच खर्डी नेवाळी ते किल्ले रायगड रस्ता बंद

## ग्रामस्थांना बसतोय फटका

**महाड : प्रतिनिधी**

किल्ले रायगडाच्या परिसराचा विकास रायगड प्राधिकरणाच्या माध्यमातून होत असतानाच सातत्याने होणारी वाहतूक कोंडी टाळण्यासाठी खर्डी नगर भवन नेवाळी ते किल्ले रायगड हा मार्ग काढण्यात आला मात्र हा मार्ग वर्षभरातच बंद ठेवण्याची पाळी प्रशासनावर आली आहे.

किल्ले रायगडकडे जाण्यासाठी महाड रायगड हा २४ किमी चा रस्ता अस्तित्वात आहे. त्याचप्रमाणे आता नव्याने माणगाव निजामपूर किल्ले रायगड आणि महाड रायगड मार्गाच्या खर्डी गावापासून नेवाळी हिरकणीवाडी ते रायगड असा एक नवा मार्ग सुरू करण्यात आला आहे. वर्षभरापूर्वी या मार्गाचे काम झाले त्याच वेळेस मार्गाची अवस्था बघून स्थानिक नागरिकांनी देखील याबाबत प्रश्न उपस्थित केला होता.

नगर भवन पासून नेवाळीपर्यंत असलेल्या डोंगरावर सरळ चढ आणि अरुंद वळणे देण्यात आले आहेत. यामुळे या मार्गावर मोठ्या बसेस जाणे शक्यच नाही. शिवाय



छोट्या कार, मालवाहतुकीची वाहने देखील नेताना चालकाची दमछाक झाली. ही अवस्था पाहून स्थानिक नागरिकांनी देखील या मार्गावरून वाहनांची ने- आण करणे टाळले.

महाड सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अभियंतांनी या मार्गाची निर्मिती करताना या सगळ्या बाबी का तपासल्या नाहीत याबाबत देखील आश्चर्य व्यक्त होत आहे. नेवाळी गावाच्या खालील बाजूला असलेल्या घाट मार्गावर तीव्र वळण आणि उतार ठेवण्यात आला आहे. याठिकाणीं आता दुरुस्तीचे काम सुरु करण्यात आले आहे. रस्ता रुंद करण्याचे काम सुरू केल्याने हा मार्ग बंद ठेवण्यात आला आहे. त्याचप्रमाणे गटार आणि मोऱ्यांची कामे देखील निकृष्ट पद्धतीची झाली आहेत. स्थानिक नागरिकांनी या तीव्र उतारा ऐवजी अन्य मार्गाचा पर्याय दिला होता मात्र स्थानिक नागरिकांच्या सूचनांकडे दुर्लक्ष करून महाड सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ओव्हर स्मार्ट अभियंत्यांमुळे हा मार्ग रुंद झालेला असला तरी भविष्यात देखील त्रासदायक ठरणार आहे.

> **नेवाळी गावापासून पुढे हा रस्ता जोडण्यासाठी आम्ही पर्याय दिला होता मात्र येथील अधिकाऱ्यांनी ऐकले नाही त्यामुळे या अवस्था निर्माण झाली आहे.**
> **– यशवंत आखाडे, स्थानिक नागरिक**

# वावेघर नाला बनला कचरा डेपो; प्रशासनाने लक्ष देण्याची मागणी

**रसायनी : प्रतिनिधी**

वावेघर ग्रामपंचायतीच्या भागांतील नाला थेट पाताळगंगा नदीला मिळतो ह्याच नालाची कचराकुंडीत रुपांतर झाले आहे याला जबाबदार वावेघर ग्रामपंचायत व आजुबाजुला असणारे सर्व ग्रामस्थ व विक्रेते आहेत. याकडेही कोणी गांभीर्याने पहात नाही व यामुळेच नदीचे पाणी प्रदूषण वाढलेले आहे . त्यामुळे येथे ग्रामस्थांनी कचरा टाकणे बंद केले पाहिजे व याबाबत महाराष्ट्र प्रदूषण मंडळ यांनी ग्रामपंचायत वावेघर यांच्या वर कारवाई केली पाहिजे.



# शिशु मंदिर शाळेच्या नवीन बांधकामाला परवानगी नाही; भाजपाकडून मुख्याधिकाऱ्यांना निवेदन

**खोपोली: प्रतिनिधी**

खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या शिशु मंदिर या शाळेच्या नवीन वर्गाच्या बांधकाम परवानगी नसताना, ठेकेदाराने बांधकाम सुरू केले आहे, याबाबत विचारणा करण्यासाठी भारतीय जनता पक्षाचे शिष्टमंडळाने यशवंत साबळे यांच्या नेतृत्वाखाली नगर परिषदेत मुख्याधिकारी डॉक्टर पंकज पाटील यांची भेट घेऊन याची चौकशीची मागणी केली असता, सदर बांधकामाला परवानगी नसल्याची



धक्कादायक बाब चर्चेदरम्यान समोर आली.

मुख्याधिकारी यांनी नगररचना विभागाच्या अधिकाऱ्यांना तातडीने बैठकीत बोलावून विचारणा केली असता सदर बांधकामाला परवानगी नसल्याचे अधिकाऱ्याकडून समजले ,त्यानंतर मुख्याधिकारी यांनी सदरचे बांधकाम तातडीने थांबविण्यात यावे असे आदेश दिले.

दरम्यान या घटनेने खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळात खळबळ उडाली आहे. संस्थेचे संचालक असलेले यशवंत साबळे यांनी नुकताच भारतीय जनता पक्षात प्रवेश घेतला आहे. त्याच्या या भूमिकेमुळे संस्थेत खळबळ उडाली आहे. त्यांनी दिलेले आव्हान संचालक वर्ग कसे पेलतात याकडे खोपोलीकर यांचे लक्ष लागले आहे.

दरम्यान सदर काम सुरू असलेल्या शिशु मंदिर या शाळेच्या नवीन वर्गाच्या कामाचे स्ट्रक्चर ऑडिट करण्यात यावे, तसेच नवीन वर्गाचे काम जुन्या इमारतीवर होत असल्याने त्याबाबत सुरक्षितता याबाबत संस्थेने काय उपाययोजना केली व आक्षेप घेतलेल्या ठेकेदाराला पुन्हा नवीन बांधकामाची ठेका देणे याबाबत चौकशी होणे गरजेचे आहे अशी ही यावेळी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

भाजप शिष्टमंडळात शहराध्यक्ष राहुल जाधव, महिला शहर अध्यक्ष अश्विनी अत्रे, माझी शहर अध्यक्ष रमेश रेटरेकर, इंदरमल खंडेलावाल, हेमंत नांदे, सूर्यकांत देशमुख, अविनाश तावडे, विक्रम साबळे, विकास खुरपडे, सुहास वझरकर, सुमती महर्षी , विभा पाठक, स्नेहल सावंत, अर्पणा साठे , सुनील नांदे, सीमा मोगरे, इत्यादी दिवसा अनेक कार्यकर्ते उपस्थित होते

# टीओडी मीटर वीज ग्राहकांच्या फायद्याचे

**कल्याण : रामप्रहर वृत्त**

कल्याण पश्चिम विभागाचे कार्यकारी अभियंता मिलींद चौधरी यांनी सोसायटीला भेट देत टीओडी मीटरबाबत असलेले वीज ग्राहकांचे गैरसमज दूर केले. टीओडी मीटरपासून ग्राहकांना मिळणाऱ्या फायद्यांबाबत त्यांनी दिलेल्या माहितीवर ग्राहकांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.



महावितरणतर्फे राज्यभरात अत्याधुनिक असे टीओडी (टाइम ऑफ डे) मीटर लघुदाब वीज ग्राहकांकडे बसवले जात आहेत. महावितरणच्या नव्या वीजदर प्रस्तावात ग्राहकाने वीज कधी वापरली त्या वेळेनुसार दरात सवलत प्रस्तावित आहे. टीओडी मीटर असल्याशिवाय ही सवलत मिळू शकणार नाही. वीज ग्राहकांकडे बसवण्यात येत असलेले मीटर प्रीपेड नव्हे तर पोस्टपेड आहेत. त्यामुळे पहिल्यासारखेच विजेचा वापर केल्यानंतर बिल येणार आहे. आधुनिक मीटर असल्यामुळे अचूक रिडिंग तसेच महावितरण व ग्राहकांना सातत्याने मोबाईलवर विजेचा वापर समजण्यासारख्या नव्या सुविधा यात आहेत. मुख्य म्हणजे महावितरणकडून ‘सुधारित वितरण क्षेत्र योजना’ या केंद्र सरकार पुरस्कृत योजनेतून ग्राहकांकडे हा मीटर मोफत बसविण्यात येत आहे.

महावितरणच्या कल्याण पश्चिम विभागात आतापर्यंत २४ हजार लघुदाब वीज ग्राहकांकडे टीओडी मीटर बसवण्यात आले आहेत, अशी माहिती कार्यकारी अभियंता चौधरी यांनी दिली. त्यासोबतच वीज नियामक आयोगाच्या तरतुदीप्रमाणे ग्राहकांच्या अचूक वीज बिलासाठी ग्राहकांकडे अत्याधुनिक मीटर बसवणे ही महावितरणची जबाबदारीच नव्हे तर अधिकारही असल्याचे त्यांनी नमूद केले. या कामात आडकाठी ही सरकारी कामात अडथळा ठरेल तसेच ग्राहकांनी कोणत्याही गैरसमजावर विश्वास न ठेवता टीओडी मीटर बसवण्याच्या कामात सहकार्य करण्याचे आवाहन त्यांनी केले.

# यंदा देशातील पहिला रेडिओ महोत्सव मुंबईत

**मुंबई : प्रतिनिधी**

जागतिक संगीत दिनाचे औचित्य साधून २१ जून रोजी सांस्कृतिक कार्य विभागामार्फत यावर्षी देशातील पहिला सृजनशील आणि सांस्कृतिक महाराष्ट्र रेडिओ महोत्सव व महाराष्ट्र आशा रेडिओ गौरव पुरस्कार २०२५ चे आयोजन करण्यात आले असल्याची घोषणा सांस्कृतिक कार्यमंत्री अॅड. आशिष शेलार यांनी पत्रकार परिषदेत केली.

२१ जून रोजी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान सभागृह येथे दु. २.०० वाजता हा सोहळा आयोजित करण्यात आला असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत १२ रेडिओ पुरस्काराचे वितरणही करण्यात येणार आहे.

# पितृदिना निमित्त विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप



**रेवदंडा : प्रतिनिधी**

पितृदिनाचे निमित्ताने आपल्या वडिलांची स्मृती, रेवदंडयातील दोन युवकांनी विदयार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटपाचा स्तुत्य उपक्रम राबवित जागविली.

रेवदंडा येथील प्रतिक विजय कोळी व सचिन मधुकर मयेकर या दोन युवकांनी पितृदिनाचे औचित्याने वडिलाचे स्मरणार्थ वही,पेन, पेन्सिल, दप्तर असे शैक्षणिक साहित्याचे गरजू विदयार्थ्यांना घरपोच वाटप केले. सदर शैक्षणिक साहित्य वाटपाचा कार्यक्रम त्यांनी कोणताही प्रचार व अथवा कार्यक्रमाव्दारे न करता थेट विदयार्थ्यांना घरपोच केले.

या उपक्रमागे कोणताही निधी किंवा मदतीचा गाजाबाजा नव्हता,तर केवळ पिंत्याकडून मिळालेली मुल्ये पुढे नेण्याचा संकल्प होता. त्यांनी हा शैक्षणिक साहित्य वाटपाचा स्तुत्य उपक्रम स्वखर्चाने केला. प्रतिक कोळी हे ओएसीस समाजभिमूख संस्था चे संस्थापक आहेत तर सचिन मयेकर हे रेवदंडा विभागात पत्रकार म्हणून क्रियाशील आहेत.

या उपक्रमात ओएसिस बहुउद्देशीय समाजभिमूख संस्था, रेवदंडा आणि एम.एम. न्युज मराठी छावा पोर्टल यांचा सहभाग होता.

पान १ वरुन

## भारताची संरक्षण क्षेत्रात मोठी झेप

याचे एक विशेष वैशिष्ट्य म्हणजे हे क्षेपणास्त्र निम्न उंचीवरून उड्डाण करून रडारला चुकवू शकते. ET-LDHCMला स्क्रॅमजेट इंजिनद्वारे उड्डाणासाठी हवेतील ऑक्सिजनचा वापर करता येतो, ज्यामुळे वेगात लक्षणीय वाढ होते. हे क्षेपणास्त्र भूमी, वायू आणि समुद्र या तीनही माध्यमांतून प्रक्षेपित केलं जाऊ शकतं, जे भारताच्या सामरिक क्षमतेत लक्षणीय वाढ करते. या क्षेपणास्त्रात फ्लाइट दरम्यान मार्ग बदलण्याची क्षमता असल्यामुळे, हे शत्रूच्या संरक्षण यंत्रणेला चकवा देऊन अचूक प्रहार करू शकते.

हायपरसॉनिक क्षेपणास्त्रांची चाचणी करताना सर्वात मोठे आव्हान म्हणजे अतितीव्र तापमान, मात्र ET-LDHCMला 2000AmoC पर्यंत तापमान झेलण्याची क्षमता असल्यामुळे, हे क्षेपणास्त्र कोणत्याही हवामान किंवा घर्षणजन्य परिस्थितीतही कार्यक्षम राहते.

इस्त्रायल-इराण संघर्ष आणि भारत-पाकिस्तान दरम्यान तणावाची वाढ, तसेच तुर्कीच्या भूमिकेमुळे क्षेत्रीय अस्थिरता निर्माण झाली आहे. अशा परिस्थितीत ET-LDHCM सारख्या प्रगत क्षेपणास्त्रांची गरज आणि उपयुक्तता अधिक वाढली आहे.

## पनवेलमध्ये भाजपतर्फे विकसित भारत संकल्प सभा

या सभेला भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, सरचिटणीस चारुशीला घरत, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, भाजपचे पनवेल मंडळ अध्यक्ष सुमित झुंजारराव, माजी नगरसेवक अनिल भगत, मनोहर म्हात्रे, गणेश कडू, मुकित काझी, राजू सोनी, अजय बहिरा, सुनील बहिरा, माजी नगरसेविका दर्शना भोईर, हेमलता म्हात्रे, सारिका भगत, प्रीती जॉर्ज, निता माळी, भाजपचे पनवेल शहर सरचिटणीस अमित ओझे, रूपेश नागवेकर, उपाध्यक्ष केदार भगत, महिला मोर्चाच्या शहर अध्यक्षा रुचिता लोंढे, पंचायत समितीचे माजी सदस्य निलेश पाटील, व्यापारी आघाडीचे अध्यक्ष संजय जैन, युवा मोर्चाचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, चिटणीस अमरीश मोकल यांच्यासह पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

## ‘एक्सप्रेस वे’वर बोगद्यात पोलिसांच्या वाहनांचा अपघात

पोलीस पथकाने कंटेनर बाजूला करण्याचे काम सुरू केले होते आणि त्यामुळे वाहतूक एकाच लेनने सुरू होती. अशा वेळी एक टेम्पो मार्ग बदलत कंटेनरच्या दिशेने आला. याच दरम्यान पोलिसांचा ताफाही मागून येत होता. समोरील वाहनाने अचानक ब्रेक लावल्याने टेम्पो, पोलिसांच्या चार पिंजरा असणाऱ्या गाड्या, दोन स्कॉर्पिओ गाड्या, एक महामंडळाची बस व अन्य वाहने एकमेकांवर आदळली.

या अपघातात मुंबई पोलीस दलातील तीन पोलीस उपनिरीक्षक, ११ अंमलदार आणि नवी मुंबई पोलिसांचे चार अंमलदार अशा एकूण १८ पोलीस कर्मचारी जखमी झाले आहेत. यापैकी एक जण गंभीर जखमी असून सर्व जखमींवर कामोठे येथील एम. जी. एम. रुग्णालयात उपचार सुरू आहेत. ताफ्यात असलेले १२ बांगलादेशी आरोपी देखील जखमी झाले असून त्यात नऊ महिला, एक लहान मूल आणि दोन पुरुषांचा समावेश आहे. या सर्वांना पनवेलच्या एम. जी. एम. रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

घटनेची माहिती मिळताच पोलीस आयुक्त, परिमंडळ २ चे पोलीस उपायुक्त, तसेच खालापूर, खोपोली, रसायनी पोलीस ठाण्यांचे अधिकारी आणि कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. रायगडचे अप्पर पोलीस अधीक्षक अभिजित शिवतारे आणि खालापूरचे डीवायएसपी विक्रम कदम यांनी घटनास्थळी भेट देऊन तपासाची माहिती घेतली. हा अपघात अत्यंत दुर्दैवी असून, संबंधित यंत्रणांकडून पुढील तपास सुरू आहे.

# उत्कृष्ट पत्रकार संघटक म्हणून राकेश खराडे सन्मानीत

**चौक : प्रतिनिधी**


महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबईच्या मराठवाडा विभागाच्यावतीने छत्रपती संभाजीनगर येथील संत एकनाथ रंगमंदिर येथे झालेल्या कार्यक्रमात रायगड जिल्ह्यातील पत्रकार राकेश खराडे यांना उत्कृष्ट पत्रकार संघटक म्हणून सन्मानित करण्यात आले.

मराठवाडा रौप्य महोत्सवी विभागीय अधिवेशनामध्ये सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट ,मंत्री अतुल सावे,एबिपी माझा वाहिनीच्या संपादिका सरिता कौशिक,जर्नलिस्ट असोसिएशनचे राष्ट्रीय अध्यक्ष अशोक वानखेडे, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष तथा प्रदेश संघटक संजय भोकरे यांच्या हस्ते उत्कृष्ट पत्रकार संघटक पुरस्कार रायगड जिल्ह्याला जाहिर करुन महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष पत्रकार राकेश खराडे यांना प्रदान करण्यात आला.पत्रकार राकेश खराडे यांना उत्कृष्ट पत्रकार संघटक पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



## दुखवटा

### पांडुरंग घरत



**उरण :** पनवेल तालुक्यातील खारकोपर येथील भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ कार्यकर्ते पांडुरंग बुधाजी घरत (६३) यांचे काल अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर खारकोपर येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. भाजपचे युवा कार्यकर्ते आशिष घरत यांचे ते पिताश्री होत. यावेळी` आमदार प्रशांत ठाकूर, महेश बालदी, यांच्यासह राजकीय, सामाजिक, अशा विविध क्षेत्रातील व्यक्ती उपस्थित होत्या त्यांच्या पश्चात पत्नी, दोन पुत्र व विवाहित कन्या, सुना, जावई, भाऊ, बहिणी, नातवंडे असा आप्त परिवार आहे. त्यांचा दशक्रिया विधी गुरुवार दिनांक २६ जून रोजी श्रीक्षेत्र लांगेश्वर मोरावे येथे सकाळी ९.०० वाजता होईल. तसेच उत्तरकार्य तेरावाविधी रविवार दिनांक २९ जून रोजी खारकोपर येथील राहत्या घरी दुपारी बारा वाजता होणार असल्याची माहिती आशिष घरत व मयूर घरत यांनी दिली.

# २० लाख कमवण्याच्या नादात ५० लाख गमावले

## आठ जणांनी घातला एकाला गंडा

**पनवेल : वार्ताहर**

रोख ५० लाख रुपये दिल्यास त्या बदल्यात आरटीजीएसद्वारे तुम्हाला २० लाख रुपये अधिक म्हणजे एकूण ७० लाख रुपये मिळतील, असे आमिष दाखवून एका टोळीने तळोजा येथील ३२ वर्षीय व्यक्तीला मुंबईतील विद्याविहार भागात बोलावून त्याच्याजवळ असलेली ५० लाख रुपयांची रक्कम घेऊन पलायन केल्याची घटना उघडकीस आली आहे. तळोजा पोलिसांनी या प्रकरणातील टोळीविरोधात गुन्हा दाखल करून शोध सुरू केला आहे.

अशरफ खान हा तळोजा फेज-१ मध्ये राहतो. त्याचे मित्र डॅनी, गोपाळ व रेहान यांनी एक व्यक्ती ५० लाख रुपये रोख दिल्यास त्या बदल्यात तो ७० लाख रुपये आरटीजीएसद्वारे देतो, असे त्याला सांगितले. या व्यवहारात अल्पावधीत २० लाख रुपये मिळतील, या आमिषाने अशरफ खान याने त्याच्या भावाकडे असलेली रोख रक्कम ५० लाख घेतली. त्यानंतर व्यवहारासाठी इमान प्रशांत आणि उज्ज्वल शहा व अन्य एक यांच्या टोळीने अशरफ खान यांच्याशी फोनवर संपर्क साधला. तसेच कॉन्फरन्स कॉलद्वारे अनेकवेळा त्याच्याशी बोलणे करत त्याला या व्यवहारासाठी तयार केले व त्यासाठी तयार होताच त्यांनी १४ जून रोजी ५० लाख रुपये घेऊन विद्याविहार येथील सोमया कॉलेजजवळ यायला सांगितले. त्यानुसार अशरफ खान हा डेंनी आणि आकाश या मित्रांसोबत ५० लाख रुपयांची रक्कम घेऊन येथे गेला.




या ठिकाणी एका सफेद रंगाच्या कारमधून आलेल्या व्यक्तींनी पोलीस आल्याचे भासवून अशरफ खान याच्याजवळची रोख रक्कम घेऊन कारमधून पलायन केले. त्यानंतर या टोळीतील उज्ज्वल शहा याने अशरफ खान याला पैसे घेण्यासाठी गोरेगाव येथील ओबेरॉय मॉलमध्ये भेटण्यास बोलावले. त्यानुसार, तो तेथे पोहचला, मात्र रात्री उशिरापर्यंत थांबल्यानंतरही तेथे अशरफला भेटायला कुणीच आले नाही.

या प्रकरणात आपली फसवणूक झाल्याची खात्री पटल्यानंतर अशरफ याने प्रथम मुंबईतील टिळक नगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार, टिळकनगर पोलिसांनी उज्ज्वल शहा, डॅनी, गोपाळ, रेहान, मनोज, इमान, प्रशांत आणि एक अनोळखी व्यक्ती अशा आठ जणांविरोधात गुन्हा दाखल करून तो पुढील तपासासाठी तळोजा पोलिसांकडे वर्ग केला आहे. त्यानुसार, तळोजा पोलिसांनी या टोळीचा शोध सुरू केल्याचे पोलिसांनी सांगितले.

# बंगल्यात चोरी

**पनवेल : वार्ताहर**



घरात जबरदस्तीने प्रवेश करून बेडरूममध्ये असलेल्या कपाटाचा लॉक तोडून तीन लाख ६० हजार रुपये चोरून नेल्याप्रकरणी चोरांविरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

विनोद गुरमे हे नवीन पनवेल, अष्टविनायक बंगलो येथे राहत असून त्यांनी तीन लाख साठ हजार रुपये कपाटात ठेवले होते. ते मित्राकडे कामानिमित्त गेले होते. या वेळी चोरांनी घराच्या खिडकीची जाळी वाकवून घरात प्रवेश करून तीन लाख साठ हजार चोरून नेले.

# आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते खारघरमध्ये सोलर प्लांटचे उद्घाटन





**खारघर : रामप्रहर वृत्त**

हावरे स्पेंडर सोसायटीने सोलर प्लांट बसवून खारघर परिसरामध्ये सौर ऊर्जेचे वापर करण्यासाठी एक आदर्श असे उदाहरण प्रस्थापित केले आहे. त्यांनी राबवलेला हा उपक्रम इतर गृहनिर्माण संस्थांसाठी प्रेरणादायी ठरेल, असे प्रतिपादन पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी खारघरमध्ये सोलर प्लांटच्या उद्घाटनावेळी केले.

खारघर येथील हावरे स्प्लेंडर को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटीनेसोलर प्लांट प्रकल्प कार्यान्वित करून पर्यावरण संरक्षणाच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल उचलत ऊर्जा बचतीचा आणि पर्यावरणाचा समतोल साधला आहे. या सोलर प्लांटच्या उद्घाटन सोहळ्याला भाजपचे जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, उपाध्यक्ष किरण पाटील, अमर उपाध्याय, दिलीप जाधव, प्रवीण बेरा, शैलेंद्र त्रिपाठी, हावरे सोसायटीचे अध्यक्ष शिवम सिंग, सचिव विश्वंभर सिंह, कोषाध्यक्ष संजय जाधव यांच्यासह अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि स्थानिक नागरिक उपस्थित होते.

या वेळी सोसायटीचे अध्यक्ष शिवम सिंग यांनी सांगितले की, हा सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित झाल्यामुळे सोसायटीचा वीज खर्च मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे. आम्ही स्वच्छ आणि शाश्वत ऊर्जेच्या दिशेने वाटचाल करत आहोत. यामुळे केवळ आर्थिक बचतच होणार नाही, तर पर्यावरणाची काळजी घेण्यातही आमचे योगदान असेल, असे सांगितले.

हावरे स्पेंडर सोसायटीने सोलर प्लांट बसवून खारघर परिसरामध्ये सौर ऊर्जेचे वापर करण्यासाठी एक आदर्श असे उदाहरण प्रस्थापित केले आहे. त्यांनी राबवलेला हा उपक्रम इतर गृहनिर्माण संस्थांसाठी प्रेरणादायी ठरेल असे प्रतिपादन पनवेलचे आमदार प्रशांथ ठाकूर यांनी खारघरमध्ये सोलर प्लांटच्या उद्घानावेळी केले. खारघर येथील हावरे स्प्लेंडर को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटीनेसोलर प्लांट प्रकल्प कार्यान्वित करून पर्यावरण संरक्षणाच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल उचलत ऊर्जा बचतीचा आणि पर्यावरणाचा समतोल साधला आहे.

या सोलर प्लांटच्या उद्घाटन सोहळ्याला भाजपचे जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, उपाध्यक्ष किरण पाटील, अमर उपाध्याय, दिलीप जाधव, प्रवीण बेरा, शैलेंद्र त्रिपाठी, हावरे सोसायटीचे अध्यक्ष शिवम सिंग, सचिव विश्वंभर सिंह, कोषाध्यक्ष संजय जाधव यांच्यासह अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि स्थानिक नागरिक उपस्थित होते. या वेळी सोसायटीचे अध्यक्ष शिवम सिंग यांनी यावेळी सांगितले की, हा सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित झाल्यामुळे सोसायटीचा वीज खर्च मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे. आम्ही स्वच्छ आणि शाश्वत ऊर्जेच्या दिशेने वाटचाल करत आहोत. यामुळे केवळ आर्थिक बचतच होणार नाही, तर पर्यावरणाची काळजी घेण्यातही आमचे योगदान असेल, असे सांगितले.





**पनवेल** : भाजप पुरस्कृत वंदे मातरम जनरल कामगार संघटनेचे उपाध्यक्ष रवी नाईक यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार प्रशांत ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजपचे ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, पनवेल दक्षिण मंडल अध्यक्ष मंगेश वाकडीकर, माजी नगरसेविका दर्शना भोईर, माजी नगरसेवक अजय बहिरा, कोप्रोलीचे माजी सरपंच रमेश पाटील, वंदे मातरम जनरल कामगर संघटनेचे उपाध्यक्ष पांडुरंग पाटील, सचिव रविंद्र कोरडे, उपेंद्र मराठे, मधुकर उरणकर, अंकुश पाटील, निलेश वांगीलकर, जगदीश पाटील, किशोर सुरते, दीपक नावडेकर, नरेश पाटील, राजपाल शेगोकार, विश्वनाथ गडगे, दीपक पवार, उमेश वारदे, शैलेश पाटणे, दामोदर पाटील, राजेंद्र म्हात्रे, दिलीप गावंड, नरेश गावण, सचिन टाकले, उमेश पाटील आदी उपस्थित होते. सर्वांनी रवी नाईक यांचे अभिष्टचिंतन केले.

# श्री साई नारायण बाबा आश्रमात मोफत आरोग्य तपासणी शिबिर

**पनवेल : वार्ताहर**

प.पू. सद्गुरु श्री साई नारायण बाबा यांच्या पनवेल रेल्वे स्टेशन रोडवरील साई नारायण बाबा आश्रमात मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

हे आरोग्य शिबिर श्री सत्यसाई सेवा संस्था पनवेल, भारत विकास पॅरिस पनवेल व इंडियन अकॅडमी ऑफ पीडियाट्रिक यांच्या मार्फत करण्यात आले होते. यावेळी शेकडो साई सेवकांनी आपली आरोग्य तपासणी करून घेतली. या निमित्ताने मोफत औषदांचेसुद्धा वाटप करण्यात आले.



दरवर्षीप्रमाणे यंदाही या मोफत आरोगु तपासणी शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्याची माहिती श्री नारायण बाबा चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष खेमचंद गोपलाणी, सेक्रेटरी रामलाल चौधरी, राम थडानी, डॉ शकुंतला भटिजा यांनी दिली.

# 'आमदार प्रशांत ठाकूर चषक २०२५ वक्तृत्व स्पर्धा'

## २३ जूनपासून होणार भव्य सुरुवात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, वक्तृत्व कौशल्य आणि नेतृत्वगुणांची जोपासना व्हावी या हेतूने 'आमदार प्रशांत ठाकूर चषक २०२५ वक्तृत्व स्पर्धा' २३ जूनपासून भव्य स्वरूपात सुरू होणार आहे. कोशिश फाउंडेशनचे अध्यक्ष परेश ठाकूर यांच्या पुढाकाराने आणि मार्गदर्शनाखाली ही स्पर्धा दरवर्षी प्रमाणे यंदाही आयोजित केली आहे. यावर्षी स्पर्धेचे हे तिसरे वर्ष असून, ही स्पर्धा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी एक महत्वपूर्ण व्यासपीठ ठरले आहे.


ही स्पर्धा वर्ग अंतर्गत फेरी, शाळा अंतर्गत फेरी आणि शालेय अंतिम फेरी होणार असून निवडक ६०० स्पर्धकांमधून अंतिम ६० विजेते ठरणार आहेत. मागील वर्षी प्रमाणे यंदाच्या वर्षीही तितक्याच उत्साहात स्पर्धा पार पडणार आहे. १६ शाळांमधून सुमारे १३ हजार विद्यार्थी सहभाग घेणार आहेत आणि त्या अनुषंगाने नियोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मिडियम स्कूल कामोठे, लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल कामोठे, चांगू काना ठाकूर विद्यालय (इंग्रजी माध्यम) नवीन पनवेल, चांगू काना ठाकूर विद्यालय (मराठी माध्यम) नवीन पनवेल, सुषमा पाटील विद्यालय कामोठे, लोकनेते दि. बा. पाटील विद्यालय कामोठे, तसेच पनवेल मनपाच्या १० प्राथमिक शाळांचा सहभाग असणार आहे.

या स्पर्धेत एकूण पाच हजार बक्षिसे असून १४०० पदके, ४०० ट्रॉफी, तसेच ६० चॅम्पियन ट्रॉफी असणार आहेत. अधिक माहितीसाठी ७५०२१००१०० या क्रमांकावर संपर्क करावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

**प्रत्येक विद्यार्थ्याला स्वतःला उत्कृष्ट पद्धतीने व्यक्त करता यावे, हीच आमची भावना आहे. वक्तृत्व स्पर्धा ही आत्मविश्वास आणि नेतृत्वगुण वाढवण्यासाठी प्रभावी साधन आहे. त्यामुळे यंदाही आमदार प्रशांत ठाकूर चषक वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.**

**-परेश ठाकूर,** अध्यक्ष, कोशिश फाउंडेशन

# मोहोपाडा येथे मोफत नेत्र तपासणी, मोतिबिंदू शस्त्रक्रिया





**मोहोपाडा : प्रतिनिधी**

मोहोपाडा येथील समर्थ नेत्रालय याकडून रसायनी तुराडे येथील ओमकारेश्वर गणपती मंदिरात मोफत डोळे तपासणी व मोतिबिंदू शस्त्रक्रीया शिबिराचे आयोजन करण्णात आले होते. या शिबिरात ८२ नागरिकांनी डोळ्यांची मोफत तपासणी केली.

या वेळी रुग्णांना मोफत आयड्रॉपही वाटप करण्यात आले.यात डोळ्यांचे आजार असणाऱ्या रुग्णांना तेत्ररोग तज्ञ डॉ.विशालाक्षी शेडबाले यांनी मार्गदर्शन केले. या वेळी १३ रुग्णांना मोतिबिंदूचा आचार असल्याचे तपासणीत दिसून आले. त्यांच्यावर मोतिबिंदू शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. या उपक्रमातून रसायनी पाताळगंगा परिसरातील गरजू रुग्णांना दृष्टीहीन मिळवून देण्याचा व रसायनी परिसर मोतिबिंदू युक्त करण्याचा संकल्प मोहोपाडा येथील समर्थ नेत्रालय याकडून करण्यात आला.

या वेळी तुराडे ग्रामपंचायत उपसरपंच मालती संतोष वाघमारे, माजी उपसरपंच रिया प्रदीप माळी, ग्रामपंचायत सर्व सदस्य दीपज्योती ग्राम संघ अध्यक्ष दीपिका ठाकूर, नीलम ठाकुर, प्रतिमा माळी, अनिता पाटील, ग्रामसंघ महिला पदाधिकारी तसेच समर्थ नेत्रालय मोहोपाडा टिम उपस्थित होते.

# उरण द्रोणागिरी आयटीआय येथे विविध ट्रेडसाठी ऑनलाईन प्रवेश सुरू

**उरण : वार्ताहर**



द्रोणागिरी औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) उरण येथे विविध ट्रेडसाठी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया चालू झाली आहे तरी इच्छुक उमेदवारांनी ऑनलाईन फॉर्म भरावेत असी विनती करण्यात आली आहे. ऑनलाईन फॉर्म भरण्याची शेवटची तारीख २६ जून २०२५ पर्यंत आहे.

द्रोणागिरी औद्योगिक प्रशिक्षण संस्था शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी विविध औद्योगिक ट्रेडसाठी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. इच्छुक उमेदवारांनी संकेतस्थळावर https://admission.dvet.gov.in/ या लिंकवर जाऊन आपले अर्ज २६ जून २०२५ पर्यंत सादर करावेत.

फिटर (२ वर्षे), टर्नर (२ वर्षे), मशीनिष्ट (२ वर्षे), इलेक्ट्रिशियन (२ वर्षे), मेकॅनिक रेफ्रिजरेषण अँड एअर कंडिशनिंग (२ वर्षे), कोपा - (१ वर्ष) या ट्रेड साठी प्रवेशासाठी पात्रता १० वी उत्तीर्ण असावा. वेल्डर (१ वर्ष) व वायरमन (२ वर्षे) प्रवेशासाठी पात्रता :- १० वी उत्तीर्ण/अनुत्तीर्ण असावा. सर्व कोर्सेस हे शासनमान्य असून प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांना नोकरी अथवा स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध होतात.

अर्ज सादर करताना सर्व आवश्यक कागदपत्रे अपलोड करणे अनिवार्य आहे. अधिक माहिती अथवा मार्गदर्शनासाठी इच्छुक उमेदवारांनी संस्थेला प्रत्यक्ष भेट द्यावी. अधिक माहितीसाठी राऊत सर (९७६६०७७५०३) व दशमुखे सर (९९६७९२९२०५) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# गुळसुंदे येथे वृक्षारोपण व वृक्ष वाटप कार्यक्रम : लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त उपक्रम



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माजी खासदार, समाजसेवक, व दानशूर व्यक्तिमत्व लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी ७५ व्या वर्षात प्रवेश केला असून त्यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त गुळसुंदे येथे वृक्षारोपण व वृक्षवाटप कार्यक्रम बुधवारी (दि. १८) पार पडला. पर्यावरण संवर्धन, हरित क्षेत्र वाढवणे आणि भावी पिढ्यांमध्ये पर्यावरणाबाबत जागरूकता निर्माण करणे या उद्देशाने हा कार्यक्रम राबवण्यात आला.

महाराष्ट्र राज्य पर्यावरण संरक्षण संस्थेचे माजी निरीक्षक तसेच पनवेल तालुका कुंभार समाज अध्यक्ष बजरंग भागवत, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ कार्यकर्ते महादेव कावडे, सामाजिक कार्यकर्ते महेश ठोकळ, शिक्षिका महाले मॅडम व विद्यार्थ्यांच्या हस्ते वृक्षारोपण झाले. कार्यक्रमात चिकू, आंबा यांसारख्या कलमी फळझाडांची वृक्षलागवड करण्यात आली. विशेष म्हणजे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणप्रेम जागृत व्हावे यासाठी त्यांना झाडांचे वाटप करण्यात आले. लहानग्यांच्या हातून रोपांची लागवड करून एक झाड, एक जीवन हा संदेश देण्यात आला.



पर्यावरण रक्षणाची गरज अधोरेखित करत सहभागी मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले व पुढील काळात अधिकाधिक वृक्षलागवड करण्याचा संकल्पही करण्यात आला. लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली समाजहिताचे असे उपक्रम हे नव्या पिढीसाठी प्रेरणादायी ठरत असून, त्यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त राबवण्यात येणारे उपक्रम समाजात सकारात्मक बदल घडवण्यासाठी उपयुक्त ठरणार आहेत.

## संपादकीय

# अकारण हिंदीविरोध

राज्य सरकारने आधी इंग्रजी व मराठी माध्यमांच्या विद्यार्थ्यांना पहिलीपासून हिंदी भाषा शिकणे अनिवार्य केले होते, मात्र मंगळवारी याबाबत एक अधिसूचना जारी करून सरकारने हिंदीची अनिवार्यता काढून टाकली आहे. पण तरीही काही जणांनी हिंदीसक्तीवरून वादंग माजवणे सुरूच ठेवले आहे.

**देशातील प्रत्येक मुलाने किमान तीन भाषा शिकाव्यात असे राष्ट्रीय शिक्षण धोरणात म्हटले आहे. मातृभाषा, इंग्रजी व संपर्कसूत्राची भाषा म्हणून हिंदी असे सुचवण्यात आले आहे, परंतु महाराष्ट्रात पहिलीपासून हिंदी भाषा शिकणे सक्तीचे करण्यात आले आहे असे म्हणत काही महिन्यांपूर्वीपासून त्याभोवती वाद पेटवण्यात आला. आता सरकारने नवा शासनआदेश जारी करून हिंदीची अनिवार्यता म्हणजे हिंदी सक्तीची भाषा असल्याचा उल्लेख काढून टाकला आहे. राज्य सरकारने आता हिंदीला पर्याय दिला आहे. कुठलीही भारतीय भाषा तिसरी भाषा म्हणून विद्यार्थी शिकू शकतात. तीन भाषांचे सूत्र नव्या शैक्षणिक धोरणात समाविष्ट करण्यात आले आहे. यात मातृभाषा अनिवार्य आहे. त्याव्यतिरिक्त दोन भाषा शिकाव्या लागणार आहेत. यापैकी एक भाषा भारतीय असायला हवी आहे. इंग्रजीचा स्वीकार सारेच सहजपणे करतात. तिसरी भाषा म्हणून कुठल्याही भारतीय भाषेचा पर्याय स्वीकारता येणार आहे हे स्वत: मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी स्पष्ट केले. हिंदी ही संपर्कसूत्राची भाषा होऊ शकते. त्यामुळे ती शिकवण्याचा प्रयत्न आहे असे यापूर्वी या धोरणाची घोषणा झाली, तेव्हाही स्पष्ट करण्यात आले होते. परंतु काही पक्ष व त्यांच्या नेत्यांना निवडणुका जवळ आल्यानंतर मराठीचा मुद्दा आठवतो. तसे ते आताही उगाच हिंदीविरोध करून वादंग निर्माण करत आहेत. राज्य सरकारने यापूर्वीच राज्यात सर्व शाळांना मराठी भाषा अनिवार्य केली आहे. दुसरी भाषा म्हणून इंग्रजी भाषेला कुणाचाच विरोध नसतो. इंग्रजी ही व्यवहारभाषा आहे त्यामुळे ती शिकायला हवी, परंतु हिंदीसारख्या भारतीय भाषेबद्दल द्वेष का? हिंदी भाषेचे शिक्षक सहज उपलब्ध होत असल्यामुळे राज्य सरकारने आधी ती अनिवार्य केली होती. परंतु आता सरकारने ही अनिवार्यता काढून टाकली आहे. त्याऐवजी कुठलीही भारतीय भाषा तिसरी भाषा म्हणून शिकता येणार आहे. एखाद्या वर्गातील २० विद्यार्थ्यांनी एखादी भाषा निवडली तर त्यांच्यासाठी त्या भाषेचा शिक्षक उपलब्ध करून दिला जाणार आहे. काही हिंदीविरोधकांना मात्र यातून हिंदीच विद्यार्थ्यांच्या माथी मारली जाईल असे वाटते. हिंदी ही सोपी भाषा असताना, तिची लिपीही मराठीसारखी देवनागरी असताना या मंडळींचा हिंदीला विरोध कशामुळे हेच कळत नाही. पहिलीपासून तीन भाषा शिकवल्यामुळे लहान मुलांवरील अभ्यासाचा बोजा वाढतो असेही काहींचे म्हणणे आहे. मुलांना फक्त इंग्रजी व मराठी शिकवली जावी, तिसऱ्या भाषेचा बोजा विद्यार्थ्यांवर इतक्या लहान वयात टाकू नये असा मुद्दा हे हिंदीविरोधक मांडतात. पण पहिलीपासून हिंदी म्हणजे मुलांना थेट कुणा नावाजलेल्या हिंदी कवीच्या गंभीर कविता शिकवल्या जाणार नाहीत. पहिलीपासून लहान मुलांच्या हिंदी कविता, काही मोजके शब्द इतपतच हिंदी शिकवली जाणार आहे. त्यामुळे बोजाचा मुद्दा हा निव्वळ कांगावाच ठरतो. महाराष्ट्रात सगळेच तोडकीमोडकी का होईना हिंदी बोलतातच. तेव्हा अकारण या विषयावरून वाद निर्माण करणे थांबवून जनहिताच्या अन्य मुद्यांकडे या नेतेमंडळींनी वळण्याची गरज आहे.**

# यावर्षीही गणेशभक्तांचा प्रवास खड्ड्यातूनच





**खबरबात**
**संतोष सुतार**

मुंबई-गोवा महामार्गाच्या रखडलेल्या कामावरून माणगाव येथे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अधिकाऱ्यांची कानउघाडणी केली. यापूर्वी अनेक नेत्यांनी वल्गना करत बढाया मारल्या, परंतु अद्यापही महामार्ग पुर्ण झाला नाही. त्यामुळे यावर्षीही कोकणातील गणेशभक्तांना वाहतूक कोंडी बरोबर खड्ड्यातून प्रवास करावा लागणार आहे. नेत्यांच्या वल्गनांसह हा महामार्ग मृत्यूचा सापळा बनलेला आहे.

माणगाव येथे मुंबई-गोवा महामार्गाची पाहणी केल्यानंतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी खासदार सुनील तटकरे यांच्या सूचनेनुसार मुंबई येथे तातडीने संबंधित उच्चस्तरीय अधिकार्यांची बैठक घेतली. या बैठकीत माणगाव आणि इंदापूर येथील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी चार पर्यायी रस्त्यांसाठी सुमारे १८ कोटी तातडीने देण्यात येतील असे आश्वासन दिले.

मात्र हे रस्ते पावसाळ्यात होणार नाहीत. माणगाव आणि इंदापूर बायपास बद्दल त्यांनी ठोस मार्ग काढलेला नाही. त्यामुळे गणेशभक्तांना यावर्षीही हाल अपेष्टा सोसत, खड्डे सहन करीत आणि वाहतूक कोंडीचा सामना करीत जीव मुठीत धरून गणेशोत्सवाला कोकणात जावे लागणार आहे.

रायगड जिल्ह्यात नागोठणे कोलाड, रातवड, कळमजे माणगाव, लोणेरे येथील पूलांची बांधकामे अजूनही सुरूच आहेत. पहिल्याच पावसात ठिकठिकाणी खड्डे पडायला सुरुवात झाली आहे. काही ठिकाणी रस्ते कमकुवत आहेत. मोर्यांची बांधकामे अर्धवट अवस्थेत असल्याने चौपदरी महामार्गावरुन एकेरी वाहतूक सुरू आहे. या महामार्गावर ठिकठिकाणी पाणी तुंबल्याने वाहतूक विस्कळित होत आहे. दरडी कोसळणे सुरू आहे. वाहतूक कोंडीमुळे सतत अपघात होऊन नाहक बळी जात आहेत. यावर तातडीने कारवाई होणे अपेक्षित आहे.

१४ वर्षांपासून रखडलेल्या या महामार्गामुळे कोकणवासीयांना अनेक समस्यांचा आणि संकटांचा सामना करावा लागत आहे. अनेक सरकारांनी आणि मंत्र्यांनी आश्वासने दिली, पण परिस्थितीत बदल झालेला नाही. न्यायालयानेही या दिरंगाईबद्दल नाराजी व्यक्त केली आहे. मुंबई-गोवा महामार्गावर होणाऱ्या कोकणवासीयांच्या रखडपट्टीवर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यांच्या स्टाइलने अधिकाऱ्यांची खरडपट्टी काढली आणि या महामार्गाची न संपणारी व्यथा पुन्हा एकदा चर्चेत आली. २०११ मध्ये पनवेल ते झाराप या ४७१ किमी महामार्गाच्या चौपदरीकरणाचा निर्णय घेण्यात आला. परंतु राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण आणि राज्य सरकारमधील समन्वयाचा अभाव, यामुळे गेल्या १४ वर्षांत मुंबई-गोवा महामार्गाची 'मृत्यूचा महामार्ग' आणि 'मृत्यूचा सापळा' अशी ओळख निर्माण झाली.

माणगाव ते इंदापूर दरम्यान तासनतास होणाऱ्या कोडींतून तातडीने मार्ग काढण्याच्या सूचना अजित पवारांनी अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. परंतु मंत्र्यांनी दिलेल्या या सूचना पाळून कोंडी फोडण्याची इच्छाशक्ती गेल्या अनेक वर्षांत प्रशासनात बसलेल्या अधिकाऱ्यांना दाखवता आलेली नाही. तत्कालीन सार्वजनिक बांधकाममंत्री छगन भुजबळ यांच्यापासून ते रवींद्र चव्हाणांपर्यंत अनेकांनी नवनवीन डेडलाइन दिल्या. तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारच्या पदरात कोकणातील जनतेने वेळोवेळी मतांचे दान टाकले; पण कोकणवासीयांच्या पदरात मात्र आतापर्यंत आश्वासना पलीकडे काहीच पडलेले नाही. देशभर रस्त्यांचे जाळे विणणारे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनाही या संदर्भात आपण कमी पडल्याचे मान्य करावे लागले.

पाच तासांत ७५ किमी रस्त्याची निर्मिती, ६२५ किमीच्या समृद्धी महामार्गाचे निर्माण, ग्रीनफील्ड, शक्तिपीठ अशा अनेकानेक महामार्गांच्या केंद्र आणि राज्य सरकारकडून होणाऱ्या घोषणा सहनशीलता संपलेला कोकणी माणूस हतबलपणे ऐकत आहे. गेली १४ वर्षे सुरू असलेल्या मुंबई-गोवा महामार्गाची डेडलाइन कधी संपणार, हा देखील एक प्रश्न आहे.

गेल्या सहा वर्षांत राज्य सरकारने डेडलाइनच्या तारखा अनेकदा बदलल्या आहेत. ॲड. ओवेस पेचकर यांनी महामार्गाच्या रखडपट्टी बाबत केलेल्या जनहित याचिकांच्या सुनावणी दरम्यान उच्च न्यायालयाने राज्य सरकारला वेळोवेळी ताशेरे ओढत खडे बोल सुनावले आहेत. तरीही कोणी दखल घेत नाही हे दुर्दैव आहे.

दरम्यान मुंबई उच्च न्यायालयात लेखी हमी देऊनही काम पूर्ण न केल्याबद्दल राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण आणि राज्य सरकारच्या सार्वजनिक बांधकाम विभागाला ५ जुलै २०२३ मध्ये उच्च न्यायालयाने ५० हजार रुपयांचा दंडही ठोठावला होता. स्वत:च दिलेली हमी अनेकदा न पाळणे हा न्यायालयाचा अवमान असल्याचे निरीक्षणही न्यायालयाने नोंदवले होते.

पनवेल ते झाराप दरम्यानच्या महामार्गात पनवेल ते माणगाव दरम्यानचा प्रवास हा सर्वांत कळीचा मुद्दा बनला आहे. माणगाव आणि इंदापूरच्या बाजारपेठांमुळे होणारी वाहतूक कोंडी फोडण्यासाठी देण्यात आलेल्या बायपासची कामेही रखडली आहेत. त्यामुळे सुट्टीच्या काळात तब्बल तीन ते पाच तासांच्या वाहतूक कोंडीला सामोरे जाण्याची वेळ प्रवाशांवर येत आहे. चिपळूण येथील बहादूर शेख नाका येथील उड्डाणपुलाचा गर्डर कोसळण्याची घटना, आरवली ते वाकेड पट्ट्यात संथ गतीने सुरू असलेली कामे, चौपदरीकरण झालेल्या कामांचा निकृष्ट दर्जा, कंत्राटदारांची मनमानी यामुळे महामार्ग इतका रखडणे हे सरकारच्या विकासाच्या चेहऱ्यालाही शोभा देत नाही.

मुंबईतून सहा तासांत कोकणात आपल्या घरी पोहोचण्याचे स्वप्न कोकणवासीयांसाठी दिवास्वप्नच ठरत आहे. १२ ते १५ तासांचा जीवघेणा प्रवास टाळण्यासाठी हजारो कोकणवासीयांना मुंबई कोल्हापूर मार्गाचा पर्याय निवडावा लागत आहे. गेल्या १४ वर्षांत २५०० हून अधिक प्रवाशांना या महामार्गावर प्राण गमावावे लागले. कोकणाला हक्काचा चांगला रस्ता मिळावा म्हणून आतापर्यंत अनेक आंदोलने उभी राहिली. खासदार सुनील तटकरेंपासून ते मंत्री उदय सामंत यांच्यापर्यंत पोहचवण्यासाठी अनेक सामाजिक संघटनांनी या आंदोलनांचे नेतृत्वही केले; पण प्रश्न सोडवण्यात मात्र त्यांना यश आलेले नाही.

ज्या ठिकाणी अजित पवारांनी अधिकाऱ्यांना कामाच्या निष्काळजीपणाबद्दल दम भरला तो माणगाव तालुका सुनील तटकरे यांच्या लोकसभा मतदारसंघात येतो. त्यामुळे आता तटकरे यांनीही आपले राजकीय वजन वापरून हा रखडलेला महामार्ग पुर्ण करण्यासाठी ताकदीने मैदानात उतरावे लागणार आहे.

मुंबई-गोवा महामार्गाचा प्रश्न हा आर्थिक चणचणीचा नाही, तर तो राजकीय इच्छाशक्तीचा आहे. इच्छाशक्तीच्या अभावामुळे काम अपूर्ण असताना टोल सुरू करण्याचे धाडस अल्पकाळ का होईना महामार्गांची जबाबदारी असणाऱ्या कंपन्या करू शकल्या. आता रखडलेल्या महामार्गाचे काम पूर्ण करण्याचे शिवधनुष्य उपमुख्यंमत्री अजित पवार आणि खासदार सुनील तटकरे यांनी उचलले आहे. त्याच्या कार्यकुशलतेतून गणेशोत्सवापर्यंत हा महामार्ग पूर्ण व्हावा. नवनव्या डेडलाइनची सवय झालेल्या कोकणवासीयांवर आणखी एका डेडलाइनची वेळ येऊ नये अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



## बदलते तंत्रज्ञान

# आयफोन १६ खरेदी करण्यासाठी ऑफर



बाजारात ॲप्पल आयफोन स्मार्टफोनची वेगळीच क्रेझ आहे. सर्वांची इच्छा असते की आपल्याकडेही ॲप्पल आयफोन असावा, मात्र किमती जास्त असल्यामुळे अनेक जण आयफोन खरेदी करणे टाळतात, पण आता अशा लोकांसाठी एक आनंदाची बातमी आहे, कारण तुम्हाला आयफोन कमी किमतीत खरेदी करण्याची सुवर्णसंधीच आहे. तुम्ही आता स्वस्तात आयफोन खरेदी करू शकता, पण नेमके कसे, चला तर मग जबरदस्त ऑफर्सबद्दल सविस्तर जाणून घेऊया...

आयफोन हा जगातील सर्वात जास्त विकल्या जाणाऱ्या स्मार्टफोनपैकी एक आहे. भारतीय स्मार्टफोन मार्केटमध्ये आयफोनला मोठी मागणीदेखील आहे. जबरदस्त लूक, स्पेसिफिकेशन्स, सिक्युरिटी फीचर्समुळे ॲपल आयफोनची किंमतदेखील तेवढीच महाग आहे, त्यामुळे पैशांअभावी अनेक जण हा महागडा स्मार्टफोन खरेदी करू शकत नाहीत, परंतु आता तुमच्यासाठी आनंदाची बातमी आहे. ॲपल आयफोन १६वर जबरदस्त ऑफर दिली जात आहे. या ऑफरअंतर्गत तुम्ही हा फोन कमी किमतीमध्ये खरेदी करू शकणार आहात. चला तर जाणून घेऊया कुठे मिळतेय ही भन्नाट ऑफर.

तुम्हीदेखील ॲपल आयफोन घेण्याच्या प्रतीक्षेत आहात का? मग ही बातमी तुमच्यासाठी खूपच खास आहे. फ्लिपकार्टने नुकतेच आयफोन १६ वर जबरदस्त सूट जाहीर केली असून, आता तुम्हाला हा हाय-एंड स्मार्टफोन तब्बल ९,९०१ रुपयांच्या सवलतीसह मिळू शकतो. सध्या ळझहेपश १६ व्हेरिएंट फ्लिपकार्टवर फक्त ६९,९९९ रुपयांमध्ये उपलब्ध आहे, ज्याची मूळ किंमत ७९,९०० होती. विशेष म्हणजे ही सवलत कोणत्याही बँक ऑफरशिवाय आणि एक्स्चेंजशिवाय सगळ्यांसाठी खुली आहे.

फ्लिकार्टवर तुम्ही जुना स्मार्टफोन एक्स्चेंज केल्यास ४५,१५० रुपयांपर्यंत अतिरिक्त सूट मिळू शकते. अर्थात, ही एक्स्चेंज व्हॅल्यू तुमच्या जुन्या फोनच्या स्थितीवर आणि लोकेशनवर अवलंबून असेल तसेच फ्लिपकार्ट ॲक्सिस बँक क्रेडिट कार्डने खरेदी केल्यास पाच टक्के अनलिमिटेड कॅशबॅक आणि ॲक्सिस यूपीआयद्वारे सुपरमनी वापरून पेमेंट केल्यास ५०० रुपयांपर्यंत कॅशबॅकदेखील मिळणार आहे.

# विनोदी लेखक, प्रवासवर्णनकार, कथाकार रमेश मंत्री



**निमित्त**

विनोदी लेखक, प्रवासवर्णनकार, कथाकार म्हणून मराठी साहित्यात स्वतःचे स्थान निर्माण करणारे रमेश मंत्री यांचा आज स्मृतिदिन. मूळचे नाव रमेश शंकर कुळकर. त्यांचा जन्म ६ जानेवारी १९२५ रोजी कोकणात कुडाळजवळच्या झाराप या गावी झाला. राजाराम मंत्री यांना दत्तक गेल्यानंतर त्यांचे नाव रमेश राजाराम मंत्री झाले. त्यांचे शिक्षण कोल्हापूरला झाले. एमए करीत असतानाच त्यांनी पत्रकारितेत प्रवेश केला. नंतर वृत्तपत्र व्यवसायाचे प्रगत शिक्षण घेण्यासाठी ते इंग्लंडला गेले.

१९५८ साली अमेरिकन सरकारच्या माहिती खात्यात अधिकारी या नात्याने रमेश मंत्री वास्तव्यासाठी अमेरिकेत गेले. १९७८ सालापर्यंत ते तिथे होते. त्या काळात देश-विदेशांत त्यांचा भरपूर प्रवास झाला. त्या प्रवासातील अनुभवांवर त्यांनी प्रवासवर्णने लिहिली. त्यांच्या लेखनाचा झपाटा वाखाणण्याजोगा होता. १९७९ साली एकाच वर्षात ३४ पुस्तके लिहिण्याचा विक्रम त्यांच्या नावावर आहे. त्यांच्या नावावर १३०हून अधिक पुस्तके आहेत. त्यातली बरीचशी प्रवासवर्णने व विनोदी पुस्तके आहेत. 'थंडीचे दिवस', 'सुखाचे दिवस', 'नवरंग' ही त्यांची वैशिष्ट्यपूर्ण प्रवासवर्णने आहेत. प्रांजळ, प्रसन्न, दिलखुलास लेखणीतून उतरलेली त्यांची प्रवासवर्णने वाचकांना त्या स्थळांच्या प्रत्यक्ष भेटीचा आनंद देतात. 'आंध्र', 'ओरिसा', 'एलिझाबेथ टेलर आणि मी', 'ओ कलकत्ता', 'करीन ती पश्चिम', 'दिशांतर', 'गांधीजींचा गुजरात', 'चार मीनार', 'जपानी आटापिटा', 'सूर्यपुत्रांचा देश', 'बारा लाखांत जगाची सफर', 'बंगलोर ते बदामी', 'संगमरवरी प्रदेश', 'सोमनाथ ते साबरमती' यासारखी अनेक प्रवासवर्णने त्यांनी लिहिली.

विनोदी फॅण्टसी हा सर्वस्वी नवा साहित्यप्रकार त्यांनी मराठी वाङ्मयात रूढ केला. त्यातूनच जेम्स बॉण्डच्या धर्तीवर जनू बांडे ही विडंबनात्मक व्यक्तिरेखा त्यांनी निर्माण केली. 'सह्याद्रीची चोरी', 'सचिवालयात हत्ती', 'अति झालं नि हसू आलं', 'ओठ सलामत तो', 'एका हाती टाळी', 'झाली काय गंमत', 'हसण्याचा तास तिसरा', 'थट्टा मस्करी', 'चोरांचा सौजन्य सप्ताह' यांसारखी आणखीही 'विनोद' याप्रकारात मोडणारी पुस्तके त्यांच्या नावावर आहेत. 'मुलखावेगळी माणसं', 'अशी असतात एकेक माणसं', 'तुमच्या पायी ठेविले मन' ही व्यक्तिचित्रणात्मक पुस्तके आणि 'साप्ताहिकी', 'चटक चांदणी', 'कुंकू', 'उत्तरकाल', 'उत्तरकांड', 'गुजगोष्टी', 'चंदेरी', 'आटापिटा' यांसारखी नाट्य, कथा, कादंबरी प्रकारांतील साहित्यनिर्मितीही त्यांनी केली.

१९९२सालच्या कोल्हापूरच्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. अध्यक्षपदावरून सोडलेल्या संकल्पाच्या पूर्तीसाठी त्यांनी गावोगावी पुस्तकांची प्रदर्शने भरवली. त्यांनी लेखकांच्या भाषणांचे ९५ कार्यक्रम वर्षभरात घडवून आणले. इंग्लंडमध्ये असताना अवकाशवीर नील आर्मस्ट्राँग व अभिनेत्री एलिझाबेथ टेलर यांना प्रत्यक्ष भेटण्याची मिळालेली संधी ही त्यांच्यासाठी अतीव समाधानाची बाब होती. आपले एक तरी पुस्तक रशियाचे अध्यक्ष गोर्बाचेव्हला अर्पण करण्याची आणि कर्मयोगी बाबा आमटे यांचे चरित्र लिहिण्याची अशी त्यांची दोन स्वप्ने जागीच विरली. अर्धांगवायूमुळे त्यांच्या भ्रमंतीला आणि गप्पाटप्पांना १९ जून १९९८ रोजी खीळ बसली हा दैवदुर्विलास होय.

**-सविता टांकसाळ**

## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

# ऑफिसमध्येही फिटनेस अशा प्रकारे राखा...

प्रदीर्घ काळ एकाच जागी बसून काम केल्याने स्नायू आखडतात. ऑफिसमध्ये आठ-आठ तास लॅपटॉपसमोर बसणं, कामात सतत लक्ष देणं, कामाच्या मधे ब्रेक न घेता येणं या सवयी शरीरावर नकळत परिणाम करतात.



सीटिंग इज द न्यू स्मोकिंग म्हणजेच सतत बसून राहणं हे आपल्या आरोग्यासाठी तितकं च घातक आहे, जितकं सिगारेटचं व्यसन! त्यामुळे या लेखात आपण पाहूया, की ऑफिसमध्ये किंवा घरच्या वर्क फ्रॉम होम सेटअपमध्ये कोणते बदल केले तर आपण जास्तीत जास्त ॲक्टिव राहू शकू.

बैठ्या कामाचे परिणाम हे शरीरातील बहुतेक सगळ्या अवयवांवर होतात. मानेचे आणि वरच्या पाठीचे स्नायू आखडतात. कंबरेचे स्नायू दीर्घकाळ ताणलेल्या अवस्थेत राहतात. काही स्नायू अति प्रमाणात ताणले जातात आणि काही अति प्रमाणात आखडून जातात. यामुळे स्नायूंना पुरेसा रक्तपुरवठा होत नाही. सतत बसून काम केल्याने चयापचय क्रिया मंदावते. परिणामी पोटावरील चरबीचं प्रमाण वाढतं, परिणामी स्थूलता वाढते, डायबेटिस, ब्लड प्रेशर, सांध्यांचे त्रास यांची शक्यता वाढते. पायाचे सांधेदेखील आखडून जातात. फुप्पुसांची कार्यक्षमता कमी होते. एका जागी बसून स्क्रीन वर काम करणाऱ्या व्यक्तींच्या डोळ्यावर ताण येतो.

**डेस्क एक्झरसाइजेस म्हणजे काय?**

डेस्क एक्झरसाइजेस म्हणजे काही सोप्या, सौम्य आणि पटकन होणाऱ्या हालचाली ज्या आपल्याला अगदी ऑफिसच्या खुर्चीवर बसल्या बसल्या ही करता येतात. या हालचालींमुळे बसून काम करण्याचे दुष्परिणाम बऱ्याच अंशी कमी होतात.

**हे डेस्क एक्झरसाइजेस कसे करावे?**

आपल्या कामाच्या पद्धतीनुसार आणि वेळेनुसार तसाच आपल्या वयाला अनुसरून हे व्यायाम ठरवले जातात. साधारणपणे मानेच्या आणि कंबरेच्या स्नायूंना योग्य प्रमाणात ताण देऊन ते पुन्हा सैल सोडले जातात, यामुळे स्नायूंवर आणि सांध्यांवर आलेला ताण कमी होतो, वेदना कमी होतात.

फिजियोथेरेपिस्ट तुम्हाला हे व्यायाम योग्य पद्धतीने शिकवू शकतात, त्यानंतर आपल्या स्मार्ट वॉचेसमध्ये किंवा मोबाईल फोनमध्ये या व्यायामांसाठी रिमाइंडर लावून ते अगदी सहजरीत्या कामाच्या ठिकाणी केले जाऊ शकतात.

# चौक परिसरात वारंवार वीज पुरवठा खंडित

## नागरिकांचे जनजीवन विस्कळीत; व्यावसायिकांचे ही नुकसान



**चौक : प्रतिनिधी**

अवकाळी वादळाने, पावसाने चौक परिसरातील वीज पुरवठा खंडित झाला होता, पण त्यानंतर वीज पुरवठा वारंवार खंडित होत आहे, याला जबाबदार कोण असा प्रश्न आता परिसरातील सामान्य माणसाला पडला आहे.

चौक परिसरात गेले काही दिवस सतत खंडित होणाऱ्या वीज पुरवठा यामुळे पाणी पुरवठा देखील खंडित होत आहे, याचे खापर पाणी पुरवठा करणाऱ्या कर्मचारी यांच्यावर फोडले जात आहे.दुग्ध व्यवसाय,मेडिकल, इस्त्री व्यवसाय, मिठाई दुकानदार, झेरॉक्स दुकानदार यांच्या व्यवसायावर परिणाम झाला असला तरी त्याचा फटका सामान्य माणसाला बसत आहे, मात्र होणारा वीज पुरवठा खंडित का होतो? यावर फक्त वॉट्स अप ग्रुपवर चर्चा सुरू होते, आणि मोबाईल चार्जिंग संपली की चर्चा शांत होते! असाच काहीसा प्रकार घडत आहे.

चौक परिसरात जवळपास चाळीस पेक्षा जास्त गावे, वाड्या वस्त्या आहेत, त्यांना तुपगाव येथून वीज पुरवठा करण्यात येतो, हा वीज पुरवठा तुपगांव येथून आसरे, आसरेवाडी,जांभिवली,करत मुंबई पुणे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक चार वर असलेल्या बापदेव मंदिर पर्यंत प्रवास असतो,तर चौक_ कर्जत फाटा येथून भिलवले,बोरगाव, वावर्ले करीत माथेरान जवळील काटवन या दुर्गम भागापर्यंत जाताना त्या परिसरातील अनेक दुर्गम भागातून वीज पुरवठा करताना जवळपास साठ किमी. पेक्षा जास्त अंतर वीज वाहिन्या यांना कापावे लागते. एका टोकाला वीज पुरवठा करताना बिघाड झाल्यास त्याचा त्रास इतर गाव, वाड्या वस्त्या यांना होतो याचे कारण शोधणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

यासाठी तुपगाव येथून निघालेल्या वाहिन्या यांना विनेगाव व बोरगाव दिशेला, आसरे बाजूला स्वतंत्ररित्या फिरवणे अत्यंत गरजेचे आहे. पावसाळा सुरुवात झाल्या नंतर अनेक ठिकाणी विद्दुत पुरवठा करणारे विद्युत खांब पडणे, वाकणे हाच प्रकार जास्त दिसून येत आहे,सद्या नवीन वीज पुरवठा अथवा दुरुस्ती ही ठेकेदार यांच्या मार्फत केली जाते, वीज पुरवठा करणारे खांब हे किती खोल खड्ड्यात असावे, विद्युत खांब उभे केल्यावर केलेले सिमेंट कॉंक्रिट यावर अजिबात पाणी न मारल्याने खांबाचा पाया कच्चा राहतो आणि वादळ वारा आल्यावर तो पडतो किंवा वाकतो यावर देखील लक्ष द्यावे लागेल,

स्थानिक ठेकेदार यावर लक्षच देत नाहीत,असाही आरोप होत आहे. त्यामुळे सर्वच ठेकेदार यांच्या कामांचे ऑडिट करण्यात यावे अशी मागणी केली जात आहे.अनेक प्रकारची झाडे यांची वेळीच तोडणी होणे, विद्युत पुरवठा करणाऱ्या खांबांच्या जवळ खोदकाम करू नये हे देखील महत्वाचे असल्याचे स्थानिक रहिवाशी यांनी सांगितले.

# परीक्षेतील गुणवत्तेपेक्षा जीवनातील गुणवत्ता वाढवा -प्रा. प्रवीण दवणे



**अलिबाग : प्रतिनिधी**

आजच्या पिढीसमोरील आव्हाने वेगळी आहेत ती ओळखा. परीक्षेत चांगले गुण मिळाले म्हणून हुरूळून जाऊ नका. नोकरी , व्यवसाय इतकेच संकुचित ध्येय ठवू नका. परीक्षेतील गुणवत्तेपेक्षा जीवनातील गुणवत्ता वाढवून चांगला माणूस व्हा, असा सल्ला ज्येष्ठ साहित्यिक प्रा. प्रवीण दवणे यांनी विद्यार्थ्यांना दिला.

श्री समर्थ फाउंडेशन व प्रिझम सामाजिक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी (दि. १८) अलिबाग येथील मेघा थिएटरमध्ये आयोजित करण्यात आलेल्या गुणवंतांच्या सत्कार समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. प्रवीण दवणे बोलत होते. विवध क्षत्रात काम करणारे, १० वी आणि १२ वी परीक्षेत उत्तीर्ण झालेले गुणवंत विद्यार्थी, स्पर्धा परीक्षेत उत्तीर्ण होऊन शासकीय सेवेत रुजू झालेले विद्यार्थी यांचा प्रा. प्रवीण दवणे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

हे मनो भंजनाचे युग आहे. पैसा झाला मोठा आणि माणूस ठरला खोटा अशी आजची सामाजिक परीस्थित आहे. जागे झालात तरच जगाल. सावध राहा . परिस्थिती कानात जे सांगते ते ऐका. दुसऱ्याचे अनुकरण करू नका. तुम्ही स्वयंभू आहात. स्वतःला ओळखा आणि आत्मविश्वासाने आव्हानांना सामोरे जा. परीक्षेतील गुणवत्तेपेक्षा जीवनाची गुणवत्ता यादी महत्वाची असते. तुमच्या कागदावरच्या गुणांना तुमच्या काळजावरच्या व्यक्तिमत्वाचे गुण जोडले गेले पाहिजे , असे प्रा. दवणे म्हणाले.

श्री समर्थ फाउंडेशनच्या अध्यक्ष ॲड.मनस्वी मोहिते, प्रिझम सामाजिक संस्थेच्या प्रमुख तपस्वी गोंधळी, डॉ. राजश्री नाईक, रमेश धनावडे, जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष ॲड.गौतम पाटील, प्रा. प्रमोद वेळे, दीपक वाळंज, रियाल एकादमीचे ऋषी पवार, घरात क्लासेसचे हर्षद घरत, ॲड. निहा राऊत, ॲड. कला पाटील, स्पर्धा विश्व अकॅडमी संचालिका सुचिता साळवी, अभिषेक पवार आदि मान्यवर यावेळी उपस्थित होते. ॲड. महेश मोहिते यांनी प्रास्ताविक केले. सौ. किरण करंदीकर यांनी सूत्रसंचालन केले.

# कायद्यांची माहिती नागरिकांपर्यंत पोहचणे गरजेचे : न्या. सुनीता तिवारी

**अलिबाग : प्रतिनिधी**

जिल्हा विधी सेवा मार्फत जे कार्यक्रम घेतले जातात त्या कार्यक्रमाचा प्रचार, प्रसार होणे गरजेचे आहे. कुठल्याही कायद्याची अंमलबजावणी करताना त्याची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचणे गरजेचे आहे, से प्रतिपादन दुसरे जिल्हा न्यायाधीश श्रीमती सुनीता तिवारी यांनी केले.




जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांच्यावतीने विधी साक्षरता शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी दुसरे जिल्हा न्यायाधीश श्रीमती सुनिता तिवारी बोलत होत्या. जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सचिव तथा वरिष्ठ न्यायाधीश श्रीमती तेजस्विनी निराळे , अलिबाग बार असोसिएशनचे अध्यक्षॲड. प्रसाद पाटील, उपाध्यक्ष ॲड. ए डी पाटील, एल इ डी एसचे वकील, लीगल एड कर्मचारी, वकील वर्ग, पक्षकार इतर कमिटी सदस्य उपस्थित होते.

कायदेविषयक जनजागृती झाली पाहिजे आणि पीडित महिलांना न्याय मिळाला पाहिजे. त्यांना न्याय मिळून देण्यासाठी जिल्हा विधी प्राधिकरण हे नेहमी तत्पर मोफत सेवा असणार आहे, असे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सचिव तथा न्यायाधीश श्रीमती तेजस्विनी निराळे यांनी आपल्या प्रास्ताविकात सांगितले.

अलिबाग बार असोसिएशन अध्यक्ष ॲड प्रसाद पाटील म्हणाले की, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणा चे कार्यक्रम हे सोशल मीडिया वरून लोकांमार्फत पोहोचले पाहिजे. यावेळी एलईडीएस असिस्टंट ॲड निलोफर शेख यांनी घरगुती हिंसाचार एक २००५ अंतर्गत पीडित महिलांना कायदेशीर मदत पुरविणे या विषयावर मार्गदर्शन करताना आदिवासी वाडीवर जाऊन अवरनेस प्रोग्राम घेऊन जनजागृती केली पाहिजे . स्त्रियांचे घरगुती हिंसाचार पासून संरक्षण कायदा २००५ चे कलम आणि लीगल सर्विस ऑथॉरिटी चे कलम १३ अनुसार सुप्रीम कोर्टाने दिलेल्या निर्देशानुसार महिलांना अति तातडीने प्रोटेक्शन सेवा पुरवण्याबाबत दिलेल्या आदेशाचे काटेकोरपणे पालन केले पाहिजे.

# पावसामुळे शेतातील राब झाले हिरवेगार, शेतकरी शेतीच्या कामात व्यस्त

**खोपोली : प्रतिनिधी**

सात तारखेला पावसाने हजेरी लावल्यामुळे शेतक–यांनी पेरणी केली असून,राब हे उत्तम तयार होत आहे.पावसाच्या सरी येत असल्यामुळे राबाना संजिवनी मिळत आहे.यामुळे शेतकर्यांच्या आश्या पल्लवीत झाल्या आहेत. त्याच बरोबर वातावरणात उष्णता सुद्धा असल्यामुळे शेतकरी वर्ग चिंताग्रस्त होत आहे.

पावसाळा सुरु झाला की,शेतकरी वर्ग शेतीच्या कामासाठी सज्य झालेला तालुक्याच्या ठिकाणी पहावयांस मिळत आहे.मात्र पावसाने चांगली साथ दिली तर शेतकरी वर्ग मातीतून सोनं पिकविले जाते ,मागिल आठवड्यामध्ये पावसाने शेतकरी वर्गास चांगला दिलासा दिल्यामुळे शेतीच्या कामाला वेग आला आहे.शेतात उखळणी सुरु झाली आहे.

दर वर्षी पाऊस नियोजित वेळेवर पडेल यांची शास्वती नसते, मात्र या वर्षी मे महिन्यातच पावसांने हजेरी लावली, शेतात राब पेरणी केल्यानंतर या वर्षी वरुणराजाने बळीराजावर चांगली कृपा दृष्टी ठेवली असल्यामुळे शेतकरी वर्गांच्या आश्या पल्लवित झाल्या आहेत.



# कृषी विभागाच्या विविध योजनांचा जागर; तळा येथील कार्यक्रमास प्रतिसाद

**तळा : प्रतिनिधी**

कृषी विभागाच्या विविध योजनांची प्रचार व प्रसिद्धी करण्यासाठी तळा तालुक्यातील गणेशनगर येथे विशेष मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन तळा कृषी विभागाकडून करण्यात आले. या कार्यक्रमास शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या कार्यक्रमास जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, रायगड वंदना शिंदे, तालुका कृषी अधिकारी विजय तूपसौंदर्य, बीटीएम – आत्मा सचिन लोखंडे आणि सहाय्यक कृषी अधिकारी गोविंद पाशीमे व गणेशनगर, मजगाव, ताम्हणे तर्फे तळे या गावातील शेतकरी मोठया संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाच्या सुरवातीस सहाय्यक कृषी अधिकारी गोविंद पाशीमे यांनी कार्यक्रमाचे प्रास्तविक केले त्यामध्ये त्यांनी सजे मध्ये घेण्यात येत असलेल्या विविध उपक्रमाची माहिती उपस्थितांना दिली यानंतर तालुका कृषी अधिकारी विजय तूपसौंदर्य यांनी उपस्थित



शेतकऱ्यांना रोजगार हमी योजने अंतर्गत फळबाग लागवड योजना, भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना, बांबू लागवड, तसेच नाचणी व तूर प्रात्यक्षिके याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

यानंतर वंदना शिंदे यांनी कृषी यांत्रिकीकरण योजना, आत्मा योजना, पीएफएमई योजना, विविध प्रात्यक्षिके, आणि नवीन कृषी तंत्रज्ञान याविषयी उपस्थित शेतकऱ्यांना सखोल माहिती देऊन योजनांचा लाभ घेण्याविषयी उपस्थित शेतकऱ्यांना आवाहन केले. व योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी कृषी विभाग शेतकऱ्यांना सहकार्य करेल असे सांगितले.

# सोमनाथ ज्योतिर्लिंगाचे मूळ अवशेष पाहण्याची महाडकरांना संधी

**महाड : प्रतिनिधी**

आर्ट ऑफ लिव्हिंग फाउंडेशन तर्फे सोमनाथ ज्योतिर्लिंग यात्रा दिनांक १५ जून ते ६ जुलै २०२५ दरम्यान महाराष्ट्रभर होणार आहे. या यात्रेद्वारे मूळ सोमनाथ ज्योतिर्लिंगाचे अवशेष जनतेसमोर आणले जाणार आहेत. महाड मध्ये सोमनाथ ज्योतिर्लिंगचे मूळ अवशेष पाहण्याची संधी महाडकरांना देखील मिळणार असून दिनांक २१ जून रोजी ही अवशेष महाडमध्ये दाखल होणार आहेत.बेंगळुरूमधील गुरुदेव श्री श्री रविशंकर यांच्याकडे असून गुरुदेवांच्या मार्गदर्शनाखाली हे पवित्र अवशेष या यात्रे निमीत्त सर्वांसाठी उपलब्ध होत आहेत.

**पेण नगरपरिषद, पेण.**
जिल्हा – रायगड

**जाहीर फेर निविदा सूचना २०२५–२६**

पेण नगरपरिषदेच्या विविध विभागाकडील कामांकरिता भांडार विभागाकडून पुढील कामाकरिता १) नगरपरिषद कार्यालयातील विविध प्रकारचे जूने सामान, साहित्य (भंगार सामान ) विक्री करणे. हया कामांकरिता योग्य त्या अनुभवी व इच्छुक पुरवठादार/ठेकेदार यांचे व्दिनोंद सिलबंद लिफाफा पध्दतीने जाहीर फेर निविदासूचना प्रसिध्द करणेंत येत आहे. पेण नगरपरिषद, भांडार विभागात निविदा फॉर्म विक्री कार्यालयीन वेळेत दि. १९/०६/२०२५ ते दि. २७/०६/२०२५ स. ११ ते सायं. ५.०० वाजेपर्यंत स्विकारल्या जातील. सदर कामाच्या अटी–शर्ती व कामासंबंधी अतिरिक्त माहिती नगरपरिषद भांडार विभागात कार्यालयीन वेळेत (सुट्टीचे दिवस खेरीज) मिळेल.

जा.क्र.पेनप/का.७/भांडार/फे.नि.प्र./२०२५–२६/८६५
दिनांक :–१८/०६/२०२५

**सही/–**
**(जीवन पाटील)**
मुख्याधिकारी
पेण नगरपरिषद, पेण.

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळवीणेत येते की मौजे वारदोली, तहसील–पनवेल, जिल्हा–रायगड, येथील खाली वर्णन करणेत आलेली शेतजमीन विद्यमान कब्जेदार श्री. सतिश भिवा पाटील, कुंदा भिवा पाटील, राहणार : वारदोली, ता. पनवेल, जिल्हा रायगड यांचेकडून आमचे अशिलानी कायम खरेदी घेणेचा व्यवहार ठरविला आहे, महसूल दप्तरी असलेले सदर शेतजमीनीचे वर्णन खालिलप्रमाणे :

**शेतजमीनीचे वर्णन**

मौजे वारदोली, तहसील पनवेल जिल्हा रायगड येथील जिल्हा परीषद रायगड, पंचायत समिती पनवेल, मे. दुय्यम निबंधक पनवेल यांचे अधीकार क्षेत्रातील.

| गट क्रमांक व उपविभाग | भोगवटादार वर्ग | क्षेत्र लावणी लायक हे.आर.प्रती | क्षेत्र पोटखराबा हे.आर.प्रती | क्षेत्र एकुण क्षेत्र हे.आर.प्रती | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|---|
| १३२/१/ब | १ | ०–९५–७० | ०–३५–३० | १–३१–०० यापैकी विक्री क्षेत्र ०–४६–०० | १४.५६ |

वरील शेतजमीन / मिळकत या बाबत अन्य कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, पोटगी, वारसा वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्यासहीत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन १५ दिवसाचे आत पोहचतील अश्या खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालक यांच्या बरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : १८/०६/२०२५

**सही/–**
**ॲड. स्वप्निल व्यं. जाधव**
बी.ए., एल. एल. बी.
(खरेदीदाराचे वकील)

**कार्यालयीन पत्ता** – शॉप नं. १५४, पनवेल महानगरपालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स, दत्त झेरॉक्सच्यावर, ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६

**पनवेल महानगरपालिका**
ता. पनवेल, जि. रायगड, पनवेल ४१०२०६

**परवाना विभाग**
**जाहीर आवाहन**

महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी–विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ मधील कलम ५ (डी) व नियम, १९६७ मधील ४ नुसार या कार्यालयामार्फत खाजगी बाजार परवाना देणेत येतो. तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३३१ अन्वये खाजगी बाजार परवाना देणेत येतो.

त्या अनुषंगाने दि. ०५/०६/२०२५ रोजीचे मा. सर्वसाधारण सभा मान्यतेने पनवेल महानगरपालिका हद्दीमध्ये खाजगी बाजार परवानगी देणेकामीची कार्यवाही सुरु करणेत येणार आहे.

तरी पनवेल महानगरपालिका हद्दीमधील सर्व नागरीक, संस्था, संघटना यांना विहित नमुन्यामध्ये, विहित शुल्क भरणा करुन खाजगी बाजार भरविणेकामी परवानगी घेणेबाबत याद्वारे जाहीर आवाहन करणेत येत आहे.

पमपा/परवाना/७५३/२०२५
दिनांक :– १८/०६/२०२५

**सही/–**
**(प्रसेनजित कारलेकर)**
उपायुक्त
परवाना विभाग
पनवेल महानगरपालिका

**पनवेल महानगरपालिका**
ता. पनवेल, जि. रायगड, पनवेल ४१०२०६

**जाहीर सूचना बाजारभावाकरिता**

| अनु.क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव |
|---|---|---|
| १. | निविदा/पमपा/मातंवि/२३२५/प्र.क्र.०२//२०२५–२६ | पनवेल महानगरपालिकेत KIOSK Machine खरेदी करणेबाबत, अंदाजपत्र तयार करणेकरिता बाजारभाव मागवित आहेत. |

या निविदेबाबतची माहिती www.panvelcorporation.com संकेतस्थळावर उपलब्ध आहे. सदर बाबतची दरपत्रके दि.१९/०६/२०२५ ते दि.२७/०६/२०२५ रोजी दु. ३.०० वाजेपर्यंत माहिती व तंत्रज्ञान विभाग, पनवेल महानगरपालिका येथे सादर करण्यात यावीत. सदर कामाबाबतची विस्तृत माहिती पनवेल महानगरपालिकेच्या माहिती व तंत्रज्ञान विभागात प्राप्त होईल. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

दिनांक : १८/०६/२०२५
जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२५/प्र.क्र.२६७/२२७०/२०२५

**सही/–**
**उप आयुक्त (मातंवि)**
पनवेल महानगरपालिका

**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

**मुदतवाढ सूचना**
**ई निविदा सूचना क्र. १४/२०२५-२०२६ (मुंबई) करीता**

दिनांक ३०/०५/२०२५ रोजी दैनिक आपलं महानगर, मुंबई,दैनिक मिड डे, मुंबई, दैनिक मुंबई तरूणभारत, मुंबई, दैनिक रामप्रहर, रायगड या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या वरील ई निविदा सूचनेतील खालील कामांकरीता ई निविदा शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्धतेबाबत मुदतवाढ सूचना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १. | महाड व अतिरिक्त महाड औद्योगिक क्षेत्रातील पथदिव्यांची देखभाल व दुरुस्ती.... महाड व अतिरिक्त महाड औद्योगिक क्षेत्रातील पथदिव्यांची दोन वर्षांच्या कालावधीकरीता सर्वसमावेशक वार्षिक तत्वावर देखभाल व दुरूस्ती करणे. | ₹ ३९,०६,७७०.०० |
| २. | महाड औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती........ महाड औद्योगिक क्षेत्रात ६३० केव्हीए कॉम्पॅक्ट सब-स्टेशनचा पुरवठा करणे, उभारणे व चाचणी घेऊन कार्यान्वित करणे. | ₹ २५,०५,२४०.०० |

उपरोक्त कामांकरीता निविदा प्रपत्र दिनांक २७/०६/२०२५ पर्यंत शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असतील.

ज्या निविदाधारकांनी यापूर्वी आपली निविदा भरली असेल अथवा अपलोड केली असेल, त्यांनी निविदेमध्ये बदल करुन किंवा बदल न करता सदर निविदा पुन्हा भरणे आवश्यक आहे, याची कृपया नोंद घ्यावी, अशा कंत्राटदारांनी शुद्धिपत्रकानंतर जर निविदा पुन्हा भरली नाही अथवा अपलोड केली नाही तर त्यांचा देकार सदर स्पर्धात्मक निविदेतून आपोआप बाद होईल.

सदर निविदा सूचनेत इतर कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

## निवडक

### विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत

**नवी मुंबई :** नेरूळ येथील पालिकेच्या शाळा क्रमांक ९८ मध्ये देखील विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत करण्यात आले.



यावेळी नवी मुंबई महानगरपालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन उपायुक्त ललिता बाबर, घन कचरा विभागाच्या उपायुक्त स्मिता काळे, माजी नगरसेविका रूपाली भगत, समाजसेवक के. एल मोदी, शिक्षण तज्ञ संगीता सिंगासणे गुरुवर्य अनंत म्हात्रे, केंद्र प्रमुख रेखापतील ज्येष्ठ शिक्षक अनंत म्हात्रे हे असलेल्या नवीन वर्षात विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी उपस्थित होते. या विद्यार्थी, पालक, शिक्षक, मुख्याध्यापक यांनी वृक्ष लागवड केली. विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकांचे करण्यात आली. सर्व विद्यार्थ्यांना फळांचे तसेच शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

### उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सत्कार



**नवी मुंबई :** स्वर्गीय अरुण परशुराम सुतार माजी सरपंच शिरवणे गाव नवी मुंबई महानगरपालिका शाळा क्रमांक १०१ माध्यमिक सन २०२५ या शैक्षणिक वर्षा मध्ये इयत्ता दहावी मध्ये पास झालेल्या ८०% हून अधिक गुण टक्के मिळवून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे भाजपाच्या माजी नगरसेविका माधुरी सुतार यांच्यातर्फे भेटवस्तू देऊन शाब्बासकीची थाप देण्यात आली. या वेळी शाळेच्या मुख्याध्यापिका माधुरी नारखडे व इयत्ता दहावी वर्गशिक्षिका मनीषा जाधव उपस्थित होत्या. विद्यार्थ्यांना भावी वाटचाल उज्वल वाटचाली करता सुतार यांनी शुभेच्छा दिल्या.

# नवी मुंबई मनपा शाळा आवारातील काम अपूर्ण

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

स्व. अरुण सुतार नवी मुंबई महापालिका शाळा क्रमांक १५ येथील शाळेच्या इमारती लगतच्या आवारामध्ये सुरू असलेले काम अद्याप सुरू आहे. या कामाचा कालावधी संपला असून आता शाळादेखील सुरू झाल्या, मात्र अद्याप कामात बेजबाबदार असलेल्या संबंधित ठेकेदारस काळ्या यादीत का टाकू नये असा प्रश्न भाजप माजी नगरसेविका माधुरी जयेंद्र सुतार यांनी उपस्थित केला आहे.

सुमारे चार महिन्यांहून अधिक कालावधीपासून सदर इमारती लगत काम चालू होते आणि त्यांनतर दोन महिन्यांच्या सुट्टीनंतर आता नवीन सत्राची शाळा सुरूही झाल्या तरी अद्याप काम पूर्णत्वास आलेले नाही. सदर काम कुठल्या प्रकारचे आहे कधी निविदा काढल्या व ऑर्डर दिल्या, कधीपर्यंत काम हे पूर्णत्वास येणे अपेक्षित आहे तसेच त्या



कामाचा दर्जा कुठल्या प्रतीचा झालेला आहे याकडे संबंधित महानगरपालिका विभागाने बेजबाबदारपणा दाखवला असून सदर कामाचा वाढीव कालावधी १५ जून रोजी संपला असून अद्याप काम अपूर्ण अवस्थेत असल्याचा आरोप माधुरी सुतार यांनी केला आहे.

शाळा सुरू होत असताना शाळेतील शैक्षणिक साहित्याबरोबरच शाळेच्या भौतिक सुविधा देखील पुरवणे अनिवार्य होते, मात्र या शाळा क्रमांक १५ येथे याचा अभाव दिसून आला. शाळा सुरु होण्याच्या आधीच सुट्टीच्या कालावधीत शाळेला स्वतः आपण भेट देऊन सदर बाब मुख्याध्यापकांच्या निदर्शनास आणून दिली होती. सदर ठिकाणी ज्या पद्धतीचे लोखंडी, खिळे, टोकेरी दगड, इतरत्र पडलेलं बांधकाम साहित्य, डेब्रिज याच्यामुळे शाळेत येणारे लहान मुले, विद्यार्थी, शिक्षक, पालक, ज्येष्ठ नागरिक यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न उभा राहिला असून मनपा प्रशासनाने याची गंभीर दखल घ्यावी, अशी मागणी माजी नगरसेविका माधुरी सुतार यांनी केली आहे.




**पनवेल : तालुक्यातील गाढेश्वर, देहरंग, मोरबे, वारदोली धबधबा, कुंडी धबधबा, हरिग्राम नदीपात्र, धोदाणी, चिंद्रण, मोहोदर, शांतीवन नदीपात्र, माची प्रबळ आदी ठिकाणी पावसाळीपर्यटन सुचनांखे फलक लावण्यात आले आहेत. या वेळी पनवेल तालुका गोपनीय पोलीस अधिकारी पंकज शिंदे, सामाजिक कार्यकर्ते रवींद्र पाटील उपस्थित होते.**

## झाडाची फांदी हटवून रस्ता वाहतूकीसाठी मोकळा

**खारघर : रामप्रहर वृत्त**

भाजप पदाधिकाऱ्यांच्या तत्परतेने रस्त्यात पडलेल्या झाडाच्या फांदीला हटविण्यात आले असून रस्ता वाहतूकीसाठी मोकळा करण्यात आला आहे.

प्रभागातील सेक्टर २० मधील विशाल जुन्नर सोसायटी समोरील एक वृक्ष आज संध्याकाळी उन्मळून रस्त्यावर पडला होता व त्यामुळे पूर्ण वाहतूक बंद झाली होती. सदर बाब सोसायटीतील रहिवाशांनी भाजपा मंडल उपाध्यक्ष व समाजसेवक किरण पाटील यांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर त्याठिकाणी किरण पाटील तात्काळ उपस्थित राहिले. पनवेल महानगरपालिका



तसेच अग्निशमन दलाच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाला बोलावून त्वरित अग्निशमन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी सदर वृक्षाची छाटणी केली त्या ठिकाणच्या फांद्या उचलण्यासाठी स्वतः किरण पाटील यांनी देखील प्रशासनाला सहकार्य केले व वाहतुकीसाठी रस्ता मोकळा करून दिला.

## नवी मुंबईत विकसित भारत संकल्प सभा

**नवी मुंबई : बातमीदार**

सन – २०१४, २०१९, नंतर २०२४ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीनंतर तिसऱ्यांदा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सरकार स्थापन झाले आणि भारताचे लोकोप्रीय पंतप्रधान नरेंद्रभाई मोदीजी यांनी ९ जून २०२४ रोजी तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेतली. अर्थात जून महिन्यात मोदी सरकारला ११ वर्षे पूर्ण होत आहेत. त्याबाबत सीबीडी वारकरी भवन येथे विकसित भारत संकल्प सभेचे दीपप्रज्वलन भारतीय जनता ज्येष्ठ नेते, हावरे प्रॉपर्टीज व्यवस्थापकीय संचालक, तथा माजी राज्यमंत्री, शिर्डी साईबाबा ट्रस्टचे अध्यक्ष सुरेश हावरे व विश्व मांगल्य ट्रस्टच्या उपाध्यक्षा नलिनी हावरे यांच्या हस्ते झाले.

तसेच त्या पुढे म्हणाल्या की, श्रीनगरचे उपराज्यपाल मनोज सिन्हा यांनी श्री अमरनाथ जी श्राइन बोर्ड (एसएएसबी) ची पुनर्रचना करून विविध क्षेत्रातील नऊ प्रतिष्ठित व्यक्तींना तीन वर्षांसाठी सदस्य म्हणून नामांकित



केले आहे. त्यामध्ये नवी मुंबईचे भाजपा ज्येष्ठ नेते तथा हावरे प्रॉपर्टीजचे व्यवस्थापकीय संचालक सुरेश हावरे यांची सदस्य म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. सदर कार्यक्रमाच्या निमित्ताने त्यांचा हि जाहीर सत्कार करण्यात आला. त्याचबरोबर विविध योजनेअंतर्गत लाभार्थी व वकील, डॉक्टर, इंजिनीअर तसेच विविध पदांवर असलेल्या लाभार्थ्यांचा सत्कार हावरे यांच्या हस्ते करण्यात आले.

आमदार मंदा म्हात्रे म्हणाल्या की, मोदी सरकारच्या प्रत्येक योजनेमध्ये जनकल्याण, सामान्य माणसाचे जीवन सुखकर करण्यासाठीच्या योजना तसेच देशाला जागतिक स्तरावर नवी ओळख देण्याच्या हेतू आहे. गेल्या ११ वर्षात मोदी सरकारने देशाच्या सीमा मजबूत केल्या, अर्थव्यवस्था मजबूत केली. तसेच तंत्रज्ञानाला सामान्य माणसापर्यंत पोहचविले. त्याच बरोबर ऑपरेशन सिंदूर कडून भारताने पाकिस्तानातील दहशतवाद्यांचे अड्डे उध्वस्त केले. पाकिस्तानचा हवाई तळ उध्वस्त केला. हिंसाचाराला, दहशतवादाला घरात घुसून उत्तर दिले जाईल हेच मोदी सरकारने दाखवून दिले. त्याच बरोबर पंतप्रधान गरीब कल्याण अन्न योजनेमधून ८१ कोटीहून हि अधिक लोकांना मोफत ध्यान्याचा पुरवठा केला, तासेच्ज ६८ लाखापेक्षा अधिक फेरीवाल्यांना स्वनिधी योजनेअंतर्गत कर्ज पुरवठा केला. मुद्रा योजनेतून ५२.५ कोटी पेक्षा अधिक छोट्या व्यावसायीकांना कर्ज पुरवठा करण्यात आला.

देशातील १११ जल मार्गांना राष्ट्रीय जलमार्ग म्हणून मान्यता देण्यात आली. त्याचबरोबर ९० लाख स्वयंसहाय्यता गटांची १० कोटीहून अधिक महिला जोडल्या गेल्या. स्वच्छ भारत अभियानात १२ कोटी पेक्षा अधिक शौचालये बांधण्यात आली. तसेच अयोध्येत श्री रामचंद्रांच्या भव्य मंदिराची निर्मिती अनेक वर्षाचे स्वप्न साकार केले. तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदिजी यांच्या ११ वर्षाच्या कार्यकाळात विविध योजनेअंतर्गत अनेक लाभार्थ्यांनी योजनानांचा लाभ घेतला. त्याच बरोबर महाराष्ट्रातदेखील मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब यांच्या नेतृत्वात नागरिकांना विविध योजनेंतर्गत लाभ मिळत असल्याचे मंदा म्हात्रे यांनी सांगितले.

## घणसोली सेंट्रल पार्कमधील जलतरण तलावास प्रतिसाद

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिकेच्या वतीने सेंट्रल पार्क, सेक्टर–३, घणसोली येथे मिनी ऑलिम्पिक आकाराचा सर्व सुविधायुक्त जलतरण तलाव १५ मे २०२५ पासून नागरिकांच्या वापरास खुला करण्यात आलेला आहे. नागरिकांच्या सोयीच्या दृष्टीने महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी सदर जलतरण तलाव अतिशय माफक दरामध्ये उपलब्ध करुन देण्यावर भर दिला असल्याने नागरिकांचा उदंड आणि उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला आहे.

या जलतरण तलावामध्ये शिकाऊ प्रशिक्षणार्थींना १५ दिवसाच्या कालावधीत प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करण्यात आली असून आजमितीस प्रशिक्षणार्थींच्या दोन बॅचेस यशस्वीपणे पूर्ण झालेल्या आहेत. पोहणे शिकाऊ नागरिकांच्या पहिल्या बॅचमध्ये २३० प्रशिक्षणार्थींनी प्रवेश घेतला होता. त्यापैकी २०९ प्रशिक्षणार्थी अतिशय उत्तम प्रकारे पोहण्यास शिकलेले आहेत. उर्वरित प्रशिक्षणार्थींपैकी दहा वर्ष आतील मुलामुलींना अधिक चांगल्या प्रकारे पोहता यावे याकरिता पुन:श्च नुतनीकरण करुन प्रशिक्षण देण्यात येत आहे.

त्यानंतर दुसऱ्या बॅचमध्ये ३३५ शिकाऊ प्रशिक्षणार्थींनी प्रवेश घेतला होता. त्यापैकी ३१३ प्रशिक्षणार्थी उत्तमरित्या पोहण्यास शिकलेले आहेत.



महानगरपालिकेच्या घणसोली जलतरण तलावामध्ये दिघ्यापासून नेरुळपर्यंतचे अनेक पालक आपल्या मुलांना प्रवेश घेण्यासाठी येत असून पहिल्याच महिन्यात ५६५ शिकाऊ आणि ४८७ पोहता येत असलेल्या अशा एकूण १०५२ नागरिकांनी जलतरण तलावाचा लाभ घेतला आहे. यासाठीच्या प्रवेश व प्रशिक्षण शुल्कापोटी रु.६.२२ लक्ष इतकी रक्कम महानगरपालिकेत जमा झालेली आहे.

प्रत्येक बॅचमध्ये क्षमतेनुसार प्रवेशाची संख्या मर्यादित असल्याने अनेक इच्छुक नागरिक व पालक प्रतिक्षा यादीवरही आहेत. त्याचबरोबर पोहता येते अशा नागरिकांनाही मासिक शुल्क आकारणी करुन प्रवेश दिला जात आहे.

घणसोली जलतरण तलावाची वेळ सकाळी ६ ते १० वा. आणि सायं. ५ ते ९ वा. असून यामध्ये प्रत्येकी एक तासाच्या नऊ बॅचेस मध्ये प्रशिक्षणार्थी व सभासदांना जलतरण तलावावर प्रवेश देण्यात येत आहे. महिलांसाठी संध्याकाळी ४ ते ५ वा. वेळेत विशेष बॅच आहे.

या तरण तलावाठिकाणी उत्तम व अनुभवी प्रशिक्षकांची व्यवस्था करण्यात आल्यामुळे त्यांच्यामार्फत कमी वेळेत जास्तीत जास्त प्रशिक्षणार्थींना उत्तम प्रकारे पोहण्यासाठी शिकविले जात आहे. त्यामुळे इतर जलतरण तलावातील इच्छुक नागरिकही याठिकाणी प्रवेशासाठी मोठ्या प्रमाणात येत आहेत.

## सायन-पनवेल महामार्गावर विशेष सखोल स्वच्छता मोहीम



**नवी मुंबई : बातमीदार**

स्वच्छ सर्वेक्षण २०२५ अंतर्गत स्वच्छता मोहीमा सातत्याने राबविल्या जात असून त्यामध्ये महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार लोकसहभागावर भर देण्यात येत आहे. पावसाळी कालावधीत स्वच्छतेवर अधिक लक्ष देत नवी मुंबई शहरातून जाणारा तथापी नवी मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारित नसलेला सार्वजनिक बांधकाम विभागाचा सायन पनवेल महामार्ग स्वच्छ राखण्याकडे आयुक्तांच्या निर्देशानुसार विशेष लक्ष दिले जात आहे.

या अनुषंगाने रविवार १५ जून व सोमवार १६ जून अशा सलग दोन दिवशी सायन पनवेल महामार्गावर नवी मुंबई महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या वतीने सखोल स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. अतिरिक्त आयुक्त श सुनिल पवार यांच्या नियंत्रणाखाली, परिमंडळ १ उपआयुक्त सोमनाथ पोटरे व घनकचरा व्यवस्थापन उपायुक्त डॉ. अजय गडदे यांच्या माध्यमातून वाशी टोल नाका ते बेलापूर खिंड अशा नवी मुंबई महानगरपालिका हद्दीतील सायन पनवेल माहामार्गाची सखोल स्वच्छता करण्यात आली.

यामध्ये वाशी विभागाचे सहा.आयुक्त श्री. सुखदेव येडवे, नेरुळ विभागाचे सहा. आयुक्त जयंत जावडेकर, बेलापूर विभागाचे सहा. आयुक्त डॉ. अमोल पालवे यांच्या मार्गदर्शनाखाली व मुख्य स्वच्छता अधिकारी राजेंद्र इंगळे यांच्या निरीक्षणाखाली स्वच्छता अधिकारी जयश्री आढळ, अरुण पाटील व नरेश अंधेर या स्वच्छता अधिकाऱ्यांनी स्वच्छता निरीक्षक व उप स्वच्छता निरीक्षक यांच्या सहयोगाने स्वच्छता मित्रांच्या मदतीने आपापल्या क्षेत्रातील महामार्ग स्वच्छतेची जबाबदारी नेटकेपणाने पार पाडली.

परिमंडळ २ मध्येही घनकचरा व्यवस्थापन विभाग उपायुक्त स्मिता काळे यांच्या मार्गदर्शनाखाली ऐरोली – मुलुंड खाडी पूल व सर्व्हिस रस्त्याची सखोल स्वच्छता करुन घेण्यात आली.

सायन पनवेल महामार्ग, ठाणे बेलापूर मार्ग हे शहरातील अत्यंत वर्दळीचे रस्ते असून दररोज हजारो वाहने ये – जा करत असतात. त्यामुळे शहराची स्वच्छ शहर प्रतिमा उंचावण्यासाठी महानगरपालिकेच्या अखत्यारित नसला तरी सायन पनवेल महामार्गाची नियमित स्वच्छता राखण्याकडे विशेष लक्ष देण्याचे निर्देश आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी घनकचरा व्यवस्थापन विभागास दिले आहेत व त्यानुसार स्वच्छता मोहीमा राबविण्यावर भर दिला जात आहे.

## नवी मुंबई पोलिसांच्या वेबसाईटमध्ये सुधारणा

**पनवेल : वार्ताहर**

पोलीस दलाने तंत्रज्ञानाच्या मदतीने नागरिक सेवा अधिक सुलभ व कार्यक्षम करण्याच्या दृष्टीने मोठे पाऊल उचलले आहे. त्यासाठी नवी मुंबई पोलिसांनी आपल्या अधिकृत वेबसाईटमध्ये महत्त्वपूर्ण सुधारणा केल्या आहेत.

या नव्या वेबसाईटमध्ये अनेक नव्या सुविधा समाविष्ट करून ती अधिक सुरक्षित व यूजर फ्रेंडली बनवण्यात आली आहे. हे बदल नागरिकांच्या वेळेची बचत, कार्यपद्धतीतील पारदर्शकता आणि पोलीस दलाबाबतचा विश्वास वाढवण्यासाठी महत्त्वाचे ठरत आहे. या नव्या वेबसाईटमुळे नवी मुंबई पोलिसांची प्रतिमा अधिक सकारात्मक होत असून इतर जिल्ह्यांसाठी ते दिशादर्शक ठरत असल्याचे सांगण्यात आले आहे.

या नव्या संकेतस्थळांमध्ये उद्योगाशी संबंधित तक्रार करण्याची सुविधा, ई-तक्रार, नोकर नोंदणी फॉर्मची सुविधा, ज्येष्ठ नागरिक नोंदणी फॉर्म, हरवलेले / सापडलेले लेख, पोलिसांबद्दल आलेल्या अनुभवाची प्रतिक्रिया देण्याची सुविधा (फीडबॅक), भाडेकरूंची ऑनलाइन नोंदणी करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच पोलीस भरती, जनजागृती व कार्यक्रमांची माहिती, इच्छुक उमेदवारांना पोलीस भरती संदर्भातील जाहिराती, पात्रता निकष, अर्ज प्रक्रिया यांची माहिती वेबसाईटवर मिळणार आहे.

भारत सरकारच्या इंडियन कॉम्प्युटर इमर्जन्सी रिस्पॉन्स टीमकडून संकेतस्थळ सुरक्षित असल्याबाबतचे सीईआरटी-इन सिक्युरिटी प्रमाणपत्र प्राप्त करण्यात आले आहे. नागरिकांना सकतस्थळ हाताळण्यास सुलभ असावे, याकरता चॅटबॉटचा समावेश सकतस्थळावर करण्यात आला आहे. नव्या सुविधांमुळे घरबसल्या पोलीस सेवा मिळत असल्याने नागरिकांमधून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

वेबसाईटचा इंटरफेस आता अधिक आकर्षक, मोबाईल फ्रेंडली आणि बहुभाषिक बनवण्यात आला आहे. इंग्रजीसोबतच मराठी भाषेतही सेवा उपलब्ध असल्यामुळे अधिकाधिक नागरिकांना या सुविधांचा लाभ घेता येणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

## पावसाळ्याच्या अनुषंगाने पोलिसांकडून सरपंचांना मार्गदर्शन

**पनवेल : वार्ताहर**

सध्या सुरू असलेल्या पावसाळ्याच्या अनुषंगाने पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वपोनि गजानन घाडगे यांनी हद्दीतील सरपंच यांची भेट घेवून त्यांना आवश्यक त्या सूचना व मार्गदर्शन केले आहे.

त्यामध्ये प्रामुख्याने पोलीस ठाणे हद्दीतील धबधबा, नदी पात्र, या ठिकाणी पर्यटकाना प्रतिबंध केला आहे. त्या बाबत सूचना फलक, बॅनर लावण्यात आलेले आहे. ग्रामपंचायततर्फे सुद्धा योग्य ती सतर्कता बाळगावी. अतिवृटी, वादळ वारा या वेळी आम्ही दिलेल्या सूचना गावातील ग्रुप माहिती देऊन नागरिकांना सतर्क करावे. फार्म हाऊस येथे सुरक्षेच्या दृष्टीने योग्य ते सूचना केल्या आहेत. गावातील धार्मिक स्थळ, शाळा/ कॉलेज, महिला/ मुली, बस स्टॉप, मुख्य रस्ते, महत्वाच्या आस्थापना येथे सुरक्षाचे अनुषंगाने सी सी टी व्ही कॅमेरे लावण्यात यावे.



विदेशी नागरिक-बांगला देशी, नायजेरियन नागरिक, इत्यादी माहिती देणे. ग्रामीण भागातील अडीअडचणी यावर चर्चा व मार्गदर्शन करण्यात आले आहे. या बैठकीस १८ सरपंच उपस्थित होते.



**पुणे :** श्री क्षेत्र देहू येथून संत तुकाराम महाराज पालखीचा प्रस्थान सोहळा अत्यंत भक्तिमय वातावरणात झाला. या पावन प्रसंगी आमदार विक्रांत दादा पाटील यांनी जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराजांचे दर्शन घेत पालखी सोहळ्यात सहभागी होऊन अध्यात्मिक समाधानाचा अनुभव घेतला. या वेळी भाजपा महाराष्ट्र प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत आमदार विक्रांत पाटील व इतर सहकाऱ्यांनी महाराष्ट्रातून आलेल्या लाखो वारकऱ्यांचे स्वागत केले.

# माथेरानमधील विविध समस्यांबाबत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंना निवेदन

**माथेरान : बातमीदार**

माथेरान शहर समस्यांचे माहेरघर झाले असून पर्यटनस्थळ असलेल्या माथेरानच्या समस्यांबाबत राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निवेदन सादर करण्यात आले आहे. माथेरान पर्यटनस्थळासाठी अतिशय महत्वाच्या तसेच येथे निवेदनात नमूद केलेले मुख्य प्रश्न तातडीने सोडविण्यासाठी उपमुख्यमंत्री तथा एकनाथ शिंदे यांनी सकारात्मकता दर्शवली असल्याचे सांगण्यात आले.



जागतिक दर्जाचे पर्यटनस्थळ असलेले माथेरान शहर अनेक समस्यांच्या विळख्यात पडलेले असून या ठिकाणी येणाऱ्या पर्यटकांना तसेच येथील स्थानिक नागरिकांना अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे.माथेरान पर्यटनस्थळाला अनेक वर्षांपासून येथे भेडसावत असणाऱ्या समस्यांबाबत स्थानिक आमदार महेंद्र थोरवे यांच्या नेतृत्वाखाली माथेरान शिवसेना शहर संघटक तथा माजी नगराध्यक्ष मनोज खेडकर, माजी नगरसेवक शिवाजी शिंदे, शिवसैनिक तथा ई–रिक्षाचे जनक सुनिल शिंदे तसेच अन्य शिवसैनिकांनी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेना पक्ष प्रमुख एकनाथ शिंदे यांची भेट घेत त्यांना निवेदन सादर केले.

यामध्ये माथेरान पर्यटनस्थळाला पर्यायी रस्ता म्हणून फ्युन्यक्युलर रेल्वे प्रकल्प त्याच बरोबर दस्तुरी नाका येथील वाहनतळात नेहमीच भेडसावणारी पार्किंग समस्या व त्यासाठी एम.पी ९३ प्लॉट नगरपालिकेकडे हस्तांतरित करणे अश्या मुख्य प्रश्नांचा निवेदनात समावेश आहे.

माथेरान येथील विविध समस्यांबाबत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सोबत चर्चा झाली.

# आरसीएफ शाळेतील सतराशे विद्यार्थ्यांचे भवितव्य अडचणीत

**अलिबाग : प्रतिनिधी**



आरसीएफ शाळेसंदर्भात आरसीएफ प्रशासनाकडून शाळेसाठी नवीन शैक्षणिक संस्थेच्या निवड केली असली तरी जुन्या शैक्षणिक संस्थेनी हस्तांतरण प्रक्रीया पूर्ण केली नाही. १६ जुन पासून राज्यभरातील शाळा सुरू झाल्या असल्या तरी आरसीएफची शाळा सुरू होऊ शकलेली नाही. या शाळेबाबत गोंधळाची स्थिती कायम आहे. त्यामुळे या शाळेत शिकणाऱ्या सतराशे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य अडचणीत येण्याची शक्यता आहे.

आरसीएफने पुणेच्या डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमातून अलिबाग तालुक्यातील कुरूळ येथील आरसीएफ वसाहतीमध्ये शाळा सुरू केली. यासाठी आरसीएफ प्रशासन आणि डेक्कन एज्युकेशन सोसायटी यांच्यात एक करार करण्यात आला होता. १९८१ ते २०११ पर्यंत हा करार अस्तित्वात होता. २०२४–२५ या शैक्षणिक वर्षापासून आरसीएफ सोबत कराराचे नुतनीकरण करण्यास डेक्कन एज्यूकेशन सोसायटीने नकार दिला. त्यामुळे शाळेचे भवितव्य अडचणीत आले.

हे प्रकरण न्यायालयात गेले तेव्हा न्यायालयाने नविन शैक्षणिक संस्थेची नेमणूक होत नाही तोवर डेक्कन एज्यूकेशन सोसायटीला शाळा सुरू ठेवण्याचे आदेश दिले. त्यानुसार आरसीएफने शाळा चालविण्यासाठी संस्थांकडून निविदा मागविल्या. आरसीएफ प्रशासनाने डीएव्ही कॉलेज मॅनिजिंक कमिटी नवी दिल्ली या संस्थेची निवड केली, मात्र डेक्कन एज्युकेशन सोसायटी कडून हस्तांतरणाची प्रक्रीया पूर्ण होऊ शकलेली नाही. त्यामुळे शाळा व्यवस्थापनाचा घोळ सुरुच राहिला आहे. १६ जुन पासून राज्यभरातील शाळा सुरू झाल्या असल्या तरी आरसीएफची शाळा सुरू होऊ शकलेली नाही.

या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी सोमवारी सायंकाळी शाळा व्यवस्थापन, कंपनी प्रशासन, शिक्षण विभाग आणि पालक प्रतिनिधींची बैठक घेतली. शाळा बंद ठेवता येणार नाही तातडीने सुरू करा, असे निर्देश जिल्हाधिकारी यांनी दिले.

डेक्कन एज्यूकेशन सोसायटी हस्तांतरण प्रक्रीयेसाठी सहकार्य करत नसल्याने जिल्हा प्रशासनाने आपले अधिकार वापरून शाळा हस्तांतरणाची प्रक्रीया पूर्ण करून द्यावी . जर हस्तांतरण होणार नसेल तर नवीन संस्थेला ही शाळा सुरू करण्यास शासनाने परवानगी द्यावी, अशी आरसीएफ प्रशासनाची भूमिका आहे.

शाळेतील सर्व शिक्षक डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे कर्मचारी आहेत. त्यांना डीएव्ही संस्था सामावून घेणार अथवा नाही याबाबतही स्पष्टता नाही. डीएव्ही संस्थेने सीबीएससी पॅटर्नने शाळा चालवण्याची तयारी दर्शवली आहे. सध्या आरसीफ शाळा एसएससी बोर्डाशी सलग्न आहे. त्यामुळे नेमक काय होणार याबाबत विद्यार्थ्यांमध्ये आणि पालकांमध्येही संभ्रमाची स्थिती आहे.

नवीन शैक्षणिक संस्थेकडे शाळा हस्तांतरण होत नाही तोवर शाळा चालवण्याची जबाबदारी डेक्कन एज्यूकेशन सोसायटीचीच आहे. या संस्थेने नियमित शाळा सुरू करावी, असे त्यांना सांगण्यात आल्याचे रायगड जिल्ह्याला माध्यमिक शिक्षण विभागातर्फे सांगण्यात आले.

# स्वातंत्र्याच्या ७८ वर्षानंतरही आदिवासींची परवड; झोळीतून रुग्णाचा खडतर प्रवास

**नेरळ : प्रतिनिधी**

तत्कालिन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्घाटन केलेला रस्ता अद्याप तयार होत नाही म्हणून कर्जत तालिक्यात आदिवासींच्या नशिबी डोलीयात्राच कायम आहे

सोमवार १६ जून रोजी .रात्रभर मुसळधार पाऊस कोसळत होता तो काही केल्या थांबण्याचे नाव घेत नव्हता. तालुक्यातील आसल ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या आसल वाडी येथील मधु गौरू पारधी या जेष्ठ नागरिकाला प्रकृती अस्वास्थ्यामुळे रुग्णालयात तत्काळ दाखल करायचे होते. गावात मान्सून काळात वाहनांसाठी रस्ता बंद होत असल्याने समोर होता एकाच पर्याय तो म्हणजे खांद्यावर लाकडीकाठीचा आधार घेत त्याला कापडी झोळी बांधण्याचा. आणि तोच प्रवास अनवाणी पायपीट करून सुरू झाला,

पावसात छत्री सांभाळायची की रुग्णाला धीर द्यायचा. परंतु त्यांच्यावर प्लॅस्टिक पिशवी अंथरूण झोळी करून



चार किलोमीटर पायपीट करून पुढे रिक्षाने नेरळ येथे रुग्णालयात पारधी यांना दाखल करण्यात आले. सुदैवाने जीव वाचला . गावात या आधी एका महिलेचा सर्पदंशाने मृत्यू झाला होता. रस्ता अभावी वाहन न मिळाल्याने महिलेने डोलीतच आपले प्राण सोडले.

आसल वाडी आणि १२ आदिवासी वाड्यांना जोडणारा राज्य मार्ग ७६ माथेरान जुमाप्पाटी ह्या रस्त्याचे ऑनलाईन पद्धतीने तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्घाटन केले होते.१४ कोटी ८० लाख रुपये एवढा निधी मंजूर होऊन वर्क ऑर्डर काढण्यात आल्याचे सांगण्यात आले. मात्र आज या गोष्टीला देखील दोन वर्षे होत आहेत. रस्ता का आणि कुठे अडकला हे कळायला मार्ग नाही की सरकारची मानसिकता दिसत नाही. आज पर्यंत रस्ता तयार न होऊ शकल्यामुळे मधु पारधी यासारखे न जाणो कित्येक ज्येष्ठ नागरिक, गरोदार महिला आदिवासींच्या नशिबी ही जिवंत पणी मरण यातना वाट्याला असल्याचे भयाण वास्तवादी चित्र पुन्हा एकदा यानिमित्ताने समोर आले आहे.

## दहावीच्या परिक्षेत फेर तपासणीत प्रबोध शिर्के रायगड जिल्ह्यात प्रथम

**माणगाव : बातमीदार**



ना. म. जोशी विद्याभवन गोरेगाव शाळेचा विद्यार्थी प्रबोध दत्ताराम शिर्केला दहावीच्या मार्च २०२५ मध्ये झालेल्या परीक्षेत ९८.२०% गुण मिळाले होते. पण त्याला आत्मविश्वास असल्याने त्याने वडील व मार्गदर्शक शिक्षकांच्या मदतीने इंग्रजीचा पेपर फेर तपासणीसाठी दिला. फेर मोजणी मध्ये दोन गुण वाढुन ९५ गुण झाले. त्यामुळे फेरमूल्यांकनामध्ये ९८.६०% गुण मिळवून रायगड जिल्ह्यात प्रथम येण्याचा मान पटकावल्याबद्दल सर्व स्तरातून त्याचे अभिनंदन होत आहे.

.त्याच्या यशाबद्दल त्याला मार्गदर्शन करणारे शिक्षक, आईवडील, शिक्षकांकडून कौतुक केले जात आहे.

# कारिवणे डोहात बुडून तरुणाचा मृत्यू

**श्रीवर्धन : बातमीदार**

श्रीवर्धन तालुक्यांतील कारिवणे येथिल धबधब्याचा आनंद लुटण्यास गेलेल्या वाळवटी येथिल तरुणाच्या जिवाशी बेतले आहे .अनिस कैसर राऊत वय (१८ वर्षे ) या तुरुणाचा खोल डोहात बुडून मृत्यू झाला आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार तिघा मित्रां सोबत अनिस हा धबधब्यावर मंगळवारी दुपारच्या वेळेस पोहायला गेला होता .धबधब्याच्या प्रवाहाच्या खाली असलेल्या खोल डोहात अनिसमे उडी मारली असता पाण्याचा अंदाज न आल्यामुळे तो खोलवर बुडाला त्यावेळी आरडा ओरड केल्यानंतर गावांतील तरुण व त्याच्या मित्रांनी त्याला मृत अवस्थेत बाहेर काढले

## देवकुंड धबधबा, सिक्रेट पॉईंट व ताम्हाणी घाट

# पर्यटनस्थळांवर मनाई आदेश

**माणगाव : प्रतिनिधी**

पोलीस निरीक्षक माणगाव यांनी माणगाव पोलीस ठाणे हद्दीतील रवाळजे दूरक्षेत्र अंतर्गत, मौजे भिरा गावचे हद्दीतील देवकुंड धबधबा व सणसवाडी गावचे हद्दीतील सिक्रेट पॉईंट व ताम्हाणी घाट व आजूबाजूच्या १ कि.मी. परिसरात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम १६३ नुसार पुढीलबाबींकरिता दि.१७ जून ते दि.३० सप्टेंबर २०२५ या कालावधीकरिता माणगाव उपविभागीय अधिकारी डॉ.संदीपान सानप यांनी प्रतिबंधात्मक मनाई आदेश जारी केला आहे.

पावसाळी हंगामात पुणे–मुंबई व महाराष्ट्रातील पर्यटकांचे आकर्षणाचे ठिकाण आहे. सिक्रेट पॉईंट या ठिकाणी सुरक्षा 'व्यवस्थेचा अभाव असल्याने पर्यटकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते व ताम्हाणी घाट हा धोकादायक वळणांचा व तीव्र उताराचा असल्याने तसेच दरड कोसळण्याचा संभव असल्याने पर्यटकांची वित्त व जीवित हानी होऊ शकते.

या कारणांमुळे देवकुंड धबधबा, सिक्रेट पॉईंट व ताम्हाणी घाट या दरम्यान पावसामुळे निर्माण झालेले नैसर्गिक धबधब्याचे परिसरामध्ये मद्यपान करणे किंवा मद्यधुंद अवस्थेत प्रवेश करणे, मद्य बाळगणे, मद्य वाहतूक करणे, अनधिकृत मद्य विक्री करणे य उघडया जागेवर मद्य सेवन करणे. पावसामुळे धोकादायक झालेली ठिकाणे, धबधबे, दऱ्यांचे कठडे, धोकादायक वळणे, इ. ठिकाणी सेल्फी काढणे व कोणत्याही स्वरुपाचे चित्रीकरण करणे तसेच रहदारीवर परिणाम करणाऱ्या ठिकाणी फोटोग्राफी करणे, रिल्स व्हिडीओ बनविणे. पावसामुळे वेगाने वाहणाऱ्या धोकादायक पाण्यात/खोल पाण्यात उतरणे व त्यामध्ये पोहणे. धबधब्याच्या वरील बाजूला जाणे अथवा धबधब्याच्या धोकादायकरित्या पडणाऱ्या पाण्याच्या झोताखाली बसणे. धोकादायक स्थिती निर्माण होईल अगर जिवित हानी होईल, असे धबधबे किंवा तलाव याठिकाणी पाण्यात उतरणे.

रहदारीच्या ठिकाणी तसेच धोकादायक ठिकाणी वाहने थांबवणे. वाहने अतिवेगाने व वाहतूक निर्माण होईल अशा प्रकारे चालविणे, वाहनाची ने–आण करताना बेदरकारपणे वाहन चालवून इतर वाहनांना धोकादायक स्थितीत ओव्हरटेक करणे. सार्वजनिक ठिकाणी खाद्यपदार्थ, कचरा, काचेच्या व प्लॅस्टीकच्या बाटल्या, थर्माकोलचे व प्लॅस्टीकचे साहित्य उघड्यावर इतरत्र फेकणे.

सार्वजनिक ठिकाणी येणाऱ्या महिलांची छेडछाड करणे, टिंगलटवाळी करणे, महिलांशी असभ्य वर्तन करणे, असभ्य व अश्लिल हावभाव करणे, शेरेबाजी करणे अथवा लज्ञा निर्माण होईल, असे कोणतेही वर्तन करणे, सार्वजनिक ठिकाणी मोठ्या आवाजात संगीत यंत्रणा वाजवणे, डी.जे.सिस्टिम वाजवणे, गाडीमधील स्पिकर वाजवणे व त्यामुळे ध्वनीप्रदूषण करणे. ज्या कृतीमुळे ध्वनी, वायू व जल प्रदूषण होईल अशी कोणतीही कृती करणे. धरण ,तलाव धबधब्याच्या १ कि.मी. परिसरात दुचाकी/तीन चाकी/चार चाकी ,सहा चाकी वाहनांनी प्रवेश करणे (अत्यावश्यक सेवा वगळून), प्रशासनाने बंदी घातली आहे,



# गोखले महाविद्यालयाचे प्रवेशद्वार बनले डम्पिंग ग्राउंड

**श्रीवर्धन : बातमीदार**

श्रीवर्धन शहराला लागून असलेल्या आराठी ग्रामपंचायत हद्दीमध्ये घाणीचे साम्राज्य पसरलेले आहे. सदर ग्रामपंचायत हद्दीमध्ये अनेक मोठमोठ्या इमारती उभ्या राहत आहेत. या आराठी ग्रामपंचायत हद्दीमध्ये श्रीवर्धन बस स्टँडच्या बाजूला असलेला मेटकर्णी परिसर, त्याचप्रमाणे आराठी गाव व नव्याने होत असलेले बोरली रोडवरील मोठमोठे कॉम्प्लेक्स, तसेच भट्टीचा माळ कडे जाणाऱ्या रस्त्यावर देखील मोठमोठे बंगले उभे राहिलेले आहेत. तर विद्यानगर परिसर देखील त्या ठिकाणी खूप मोठ्या प्रमाणात उभारण्यात आलेला आहे.



वास्तविक पाहता अराठी ग्रामपंचायतीची लोकसंख्या व त्या ठिकाणी होणारी डेव्हलपमेंट पाहता ग्रामपंचायतीने डम्पिंग ग्राउंड तयार करणे आवश्यक आहे. परंतु तसे कोणत्याही प्रकारचे प्रस्ताव सुद्धा ग्रामपंचायत मध्ये घेतले गेले नाहीत. याच ग्रामपंचायतीच्या हद्दीमध्ये गोखले महाविद्यालय देखील आहे. याच गोखले महाविद्यालयाच्या प्रवेशद्वारावरती आराठी ग्रामपंचायत हद्दीतील सर्व कचरा फेकण्यात येतो. अनेक वेळा मेलेली कुत्री, मेलेली मांजरे, त्याचप्रमाणे चिकनच्या दुकानातील अनावश्यक मास व कोंबडीची पिसे देखील याच ठिकाणी टाकलेली आढळून येतात. त्यामुळे गोखले महाविद्यालयात जाणाऱ्या विद्यार्थ्यांना विद्यार्थिनींना नाक मुठीत घेऊनच जावे लागते.

आराठी ग्रामपंचायत हद्दीमध्ये असलेल्या अनेक चार मजली इमारतींमधील सांडपाण्याची व्यवस्था देखील योग्य प्रकारे केलेली आढळून येत नाही. अनेक वेळेला हे सांडपाणी रस्त्यावरून वाहत असते. त्यामुळे या परिसरात नेहमीच दुर्गंधीचे साम्राज्य असते. संपूर्ण भारतामध्ये स्वच्छता अभियान राबविले जात आहे. स्वच्छतेसाठी अनेक उपाय योजण्यात येत आहेत. परंतु आराठी ग्रामपंचायत या सर्व स्वच्छता अभियानापासून दूर असल्याचे दिसून येत आहे.

आराठी ग्रामपंचायत हद्दीत अशाच प्रकारे घाणीचे व कचऱ्याचे साम्राज्य राहिल्यास त्याचे गंभीर परिणाम या परिसरात राहणाऱ्या नागरिकांनाच भोगावे लागणार आहेत. तरी रायगड जिल्हा परिषदेने आराठी ग्रामपंचायतची सखोल पाहणी करून ग्रामपंचायत हद्दीमध्ये स्वच्छता कशी राहील याबाबत संबंधित ग्रामपंचायतीला सूचना द्याव्यात. अशी मागणी केली जात आहे.

## सागरी मत्स्यव्यवसाय, नौकानयन, डिझेल इंजिन देखभाल आणि परिचालन प्रशिक्षण कार्यक्रम

**रायगड : रामप्रहर वृत्त**

सागरी मत्स्यव्यवसाय, नौकानयन व डिझेल इंजिन देखभाल व परिचालन या मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण केंद्र, रायगड–अलिबाग येथे दिनांक १ जुलै २०२५ पासून प्रशिक्षणाच्या सुरु होणाऱ्या प्रशिक्षण सत्रासाठी रायगड जिल्ह्यातील युवकांनी दि.३० जून २०२५ पर्यंत अर्ज सादर करावेत,असे आवाहन मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण अधिकारी गणेश टेमकर यांनी केले आहे.

प्रशिक्षण कालावधी– ०१ जुलै २०२५ ते ३१ डिसेंबर २०२५ (६ महिने) आहे.आवश्यक पात्रता पुढीलप्रमाणे आहे. उमेदवाराचे वय १८ ते ३५ वर्ष असावे. आधारकार्ड व रेशनकार्ड छायाप्रत जोडणे. उमेदवार किमान चौथी पास असणे आवश्यक, शाळा सोडल्याच्या दाखल्याची छायांकित प्रत जोडणे आवश्यक, क्रियाशील मच्छिमार व किमान एक वर्ष मासेमारीचा अनुभव असावा. तसेच विहित नमुन्यातील अर्जावर मच्छिमार सहकारी संस्थेची शिफारस घ्यावी. उमेदवारास पोहता येणे आवश्यक आहे.

# रोह्यातील मंदिर सुरक्षेच्या दृष्टीने पोलीस ठाण्यामध्ये बैठक



**धाटाव : प्रतिनिधी**

मंदिर हे श्रद्धेचे केंद्र असल्यामुळे तेथे भाविकांच्या दृष्टीने तसेच इतर व्यवस्था कशी असावी तसेच जेणेकरून अनुचित प्रकारघडूनये यासाठी रोहा तालुक्यातील सर्व मंदिर सुरक्षेच्या दृष्टीने मंदिर कमिटी, पुजारी, अध्यक्ष व उपाध्यक्ष यांना सुरक्षेच्या सूचना रोहा पोलीस स्टेशनच्या वतीने सोमवार दि. ( १६ ) रोजी देण्यात आल्या तर त्यावेळी रोहा पोलीस स्टेशनचे निरीक्षक मारुती पाटील व पायक यांनी मार्गदर्शन व सूचना केल्या . या बैठकीत मंदिर कमिटीचे तालुक्यातील ५५ सदस्य होते. तालुक्यातील सर्व पुजारी अध्यक्ष व उपाध्यक्ष तसेच मंदिर कमिटीने आपला मंदिर सुरक्षित दृष्टीने मंदिर परिसरात जास्तीत जास्त सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात यावी, मंदिरातील पुजारी / अध्यक्ष यांनी मंदिरात येणाऱ्या भाविकांचे गैरसोय होणार नाही त्याकरता योग्य उपाय योजना करण्यात याव्यात तसेच मंदिरातील दाग दागिने, दानपेटी सुरक्षित ठिकाणी ठेवण्यात यावी. मंदिराची विटंबना होणार नाही या बाबत काळजी घ्यावी मंदिरात दिवसा व रात्री पुजारी किंवा स्वयंसेवक नेमण्यात यावे. जे दर्शन घेण्यासाठी भाविक येत असतात त्यांच्या वाहनाचे व्यवस्था करून द्यावी म्हणजे इतरांना अडचण होणार नाही, अशा सूचना सदस्यांना देण्यात आल्या.

# टी-२० सामन्यात तिहेरी सुपर ओव्हरचा थरार!

## नेदरलँड्सचा ऐतिहासिक विजय, नेपाळची झुंज अपुरी

**ग्लासगो : वृत्तसंस्था**

क्रिकेटच्या मैदानावर अनेकदा रोमांचक आणि अविश्वसनीय सामने पहायला मिळतात. असाच एक सामना स्कॉटलंडच्या ग्लासगो येथील टिटवुड मैदानावर खेळला गेला. ट्राय-सीरिजमधील हा दुसरा सामना नेपाळ आणि नेदरलँड्स यांच्यात खेळला गेला, ज्याने क्रिकेटप्रेमींना थक्क करून सोडले. या सामन्यात तब्बल तीन सुपर ओव्हर खेळवल्या गेल्या आणि या अभूतपूर्व थरारनाट्यात अखेर नेदरलँड्सने विजयश्री खेचून आणली.

सध्या स्कॉटलंड, नेपाळ आणि नेदरलँड्स या संघांमध्ये टी-२० तिरंगी मालिका खेळली जात आहे. या मालिकेतील दुसऱ्या सामन्यात टिटवुड मैदानावर नेपाळ आणि नेदरलँड्स आमने सामने होते. नेदरलँड्सने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत ७ गडी गमावून १५२ धावांचा संयमित पण आव्हानात्मक धावसंख्या उभारली. तेजा निदामनुरू (३५), विक्रमजीत सिंग (३०)



आणि साकिब झुल्फिकार (२५) यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. नेपाळच्या फिरकीपटूंनी विशेषत: संदीप लामिछाने आणि ललित राजबंशी यांनी नेदरलँड्सला मोठा स्कोअर करण्यापासून रोखले. लामिछानेने चार षटकांत केवळ १८ धावा देत तीन बळी घेतले.

प्रत्युत्तरात नेपाळनेही २० षटकांत आठ गडी गमावून १५२ धावांपर्यंत मजल मारली. कर्णधार रोहित पौडेलने ४८ धावांची दमदार खेळी केली. शेवटच्या षटकात नेपाळला विजयासाठी १६ धावांची गरज होती, पण संघ फक्त १५ धावा करू शकला. अखेरच्या चेंडूवर नंदन यादवने चौकार मारला, ज्यामुळे सामना टाय झाला.

निर्धारित षटकांमधील सामना टाय झाल्याने सुपर ओव्हरचा पर्याय निवडण्यात आला. पहिल्या सुपर ओव्हरमध्ये नेपाळने फलंदाजी करताना १९ धावा फटकावल्या, ज्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढला, पण नेदरलँड्सनेही हार न मानता १९ धावाच केल्या आणि पहिली सुपर ओव्हरही टाय झाली. क्रिकेटप्रेमींची उत्सुकता आता शिगेला पोहचली होती.

दुसऱ्या सुपर ओव्हरमध्ये नेदरलँड्सने प्रथम फलंदाजी करत १७ धावा केल्या. नेपाळला विजयासाठी १८ धावांची गरज होती, पण त्यांनीही १७ धावाच केल्या. यामुळे सामना पुन्हा एकदा टाय झाला. क्रिकेट इतिहासात पहिल्यांदाच दुसऱ्या सुपर ओव्हरनंतरही विजेता ठरला नाही. यामुळे सामना तिसऱ्या सुपर ओव्हरकडे वळला, ज्याने सर्वांना खिळवून ठेवले.

दोन सुपर ओव्हर बरोबरीत सुटल्यानंतर या सामन्याबद्दल चाहत्यांचा उत्साह शिगेला पोहचला होता. तिसऱ्या सुपर ओव्हरमध्ये नेपाळला प्रथम फलंदाजीची संधी मिळाली, पण त्यांनी हाराकिरी केली. नेपाळच्या संघाने एकही धाव न काढता दोन्ही विकेट गमावल्या. नेदरलँड्सच्या झॅक लॉयन कॅशेटने निर्णायक भूमिका बजावली, ज्यामुळे नेपाळची धावसंख्या २ बाद शून्य राहिली. अखेर नेदरलँड्सने केवळ १ धावेचे लक्ष्य मायकेल लेव्हिटच्या पहिल्याच चेंडूवरील षटकाराच्या जोरावर आरामात गाठले आणि ऐतिहासिक विजय नोंदवला.

### क्रिकेटच्या इतिहासात नवा अध्याय

यापूर्वी भारत विरुद्ध अफगाणिस्तान (२०२४) यांच्यात टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये दोन सुपर ओव्हर्सचा सामना पहायला मिळाला होता, पण तीन सुपर ओव्हर्सचा सामना हा पहिल्यांदाच खेळला गेला. हा सामना केवळ नेदरलँड्सच्या विजयासाठीच नव्हे, तर क्रिकेटच्या अनिश्चिततेसाठीही कायम स्मरणात राहील. हा सामना क्रिकेटप्रेमींसाठी एक अविस्मरणीय अनुभव ठरला, ज्याने टी-२० क्रिकेटच्या लोकप्रियतेची आणि रोमांचाची नवी परिभाषा लिहिली.

# टीम इंडियात होणार 'सरप्राईज एन्ट्री'

## इंग्लंडविरुद्ध मालिकेसाठी हर्षित राणाची चाचपणी



**लंडन : वृत्तसंस्था**

भारत वि. इंग्लंड कसोटी मालिकेची सर्वच क्रिकेट चाहते आतुरतेने वाट पाहत आहेत. येत्या २० जूनपासून या कसोटी मालिकेला सुरुवात होणार आहे. रोहित शर्मा आणि नंतर विराट कोहलीच्या निवृत्तीमुळे आता भारतीय संघात एका नव्या युगाला सुरुवात झाली आहे. रोहित शर्मानंतर आता शुबमन गिलच्या खांद्यावर संघाती जबाबदारी देण्यात आली आहे, तर संघातही मोठी बदल आहेत. त्यामुळे आता प्लेईंग इलेव्हन कशी असणार यावर चर्चा सुरू आहेत. यादरम्यान एक नवा गोलंदाज संघात दाखल झाला आहे.

भारताच्या सिनियर संघापूर्वी भारताचा अ संघ इंग्लंड दौऱ्यावर होता, जिथे या संघाने दोन अनऑफिशियल कसोटी सामने खेळले होते. या अ संघातील एक खेळाडू आता भारतीय संघात दाखल झाला आहे. या खेळाडूबाबत बीसीसीआयने अद्याप अधिकृत घोषणा केलेली नाही, पण रिपोर्ट्सनुसार हा खेळाडू भारतीय सिनियर संघाबरोबर थांबणार आहे.

बीसीसीआयने इंग्लंड मालिकेसाठी भारतीय संघ जाहीर केला तेव्हा त्यात १८ खेळाडूंचा समावेश होता. आता या संघात हर्षित राणाला अचानक संघात प्रवेश देण्यात आल्याचे वृत्त रिपोर्ट्समध्ये समोर आले आहे. भारताच्या अ संघाबरोबर हर्षित मायदेशी परतणार नसून तो इंग्लंडमध्येच थांबणार आहे.

हर्षित राणा इंग्लंडमध्ये थांबल्याने भारताचं वेगवान गोलंदाजी युनिट आणखी मजबूत झाली आहे. संघात आधीच जसप्रीत बुमराह, मोहम्मद सिराज, अर्शदीप सिंग, आकाश दीप, प्रसिद्ध कृष्णा, शार्दुल ठाकूर आणि नितीश कुमार रेड्डी आहेत. आता पहिल्या कसोटीत कोणत्या गोलंदाजांना संधी देणार हे पहावे लागणार आहे. भारताच्या अ संघाकडून खेळताना गोलंदाज अंशुल कंबोजने चांगली गोलंदाजी केली होती, पण त्याच्याऐवजी हर्षितला इंग्लंडमध्ये थांबायला सांगितल्याने टीकादेखील केली जात आहे.

### ...तर मिळणार संधी

जसप्रीत बुमराह या मालिकेत पाच सर्व कसोटी सामने खेळू शकणार नाहीये. तो दोन ते तीन सामने खेळेल. बुमराहला विश्रांती दिल्यावर हर्षित राणाचा संघात समावेश केला, तर त्याला संधी दिली जाऊ शकते. हर्षितने नुकतेच ऑस्ट्रेलिया मालिकेदरम्यान कसोटी पदार्पण केले. आतापर्यंत त्याने दोन कसोटी सामन्यांमध्ये चार विकेट्स घेतल्या आहेत. तर भारत अ संघाकडून खेळताना हर्षित फक्त एकच विकेट घेण्यात यशस्वी ठरला.

# टी-२० विश्वचषकाचे वेळापत्रक जाहीर!



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) आगामी टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेचे वेळापत्रक घोषित केले आहे. ही स्पर्धा पुढील वर्षी खेळवण्यात येणार आहे. वेळापत्रक जाहीर झाल्याने कोणत्या संघाला कोणत्या गटात स्थान मिळाले आहे, हे देखील स्पष्ट झाले आहे. विशेष म्हणजे, भारत आणि पाकिस्तान या पारंपरिक प्रतिस्पर्धी संघांना पुन्हा एकदा एकाच गटात स्थान देण्यात आले आहे. या दोन संघांमधील बहुप्रतिक्षित महामुकाबला कधी होणार, याची तारीखही आता समोर आली आहे.

महिला टी-२० विश्वचषक २०२६ चे आयोजन पुढील वर्षी इंग्लंडमध्ये होणार आहे. ही या स्पर्धेची १०वी आवृत्ती असेल. जून महिन्यात होणाऱ्या या विश्वचषकाचा पहिला सामना १२ तारखेला खेळवला जाईल, ज्यात यजमान इंग्लंडचा सामना श्रीलंकेशी होईल. या विश्वचषक स्पर्धेत एकूण १२ संघ सहभागी होणार असून, त्यामुळे ही आतापर्यंतची सर्वात मोठी स्पर्धा ठरू शकते, असे म्हटले जात आहे.

आयसीसीने यासाठी दोन गट तयार केले आहेत. गट १ मध्ये ऑस्ट्रेलिया, दक्षिण आफ्रिकेसह भारत आणि पाकिस्तान या संघांचा समावेश करण्यात आला आहे. या व्यतिरिक्त आणखी दोन संघ यात सामील होतील, ज्यांचा निर्णय नंतर घेतला जाईल.

टी-२० विश्वचषकाच्या दुसऱ्या गटालध्ये यजमान इंग्लंड व्यतिरिक्त न्यूझीलंड, श्रीलंका आणि वेस्ट इंडिज या संघांचा समावेश आहे. दोन संघ जागतिक पात्रता फेरीतून (ग्लोबल क्वालिफायर) येथे प्रवेश करतील. नियमांनुसार, सर्व संघ आपापल्या गटातील इतर संघांशी सामने खेळतील, त्यानंतर गुणतालिकेतील अव्वल दोन संघ थेट उपांत्य फेरीत प्रवेश करतील. उपांत्य फेरीचे सामने ३० जून आणि २ जुलै रोजी होतील. त्यानंतर ५ जुलै रोजी अंतिम सामना खेळवला जाईल. हा सामना लॉर्ड्सच्या ऐतिहासिक मैदानावर खेळला जाईल.

### भारत-पाकिस्तान महासंग्राम १४ जून रोजी

भारत आणि पाकिस्तान एकाच गटात असल्याने, त्यांच्यातील सामना साखळी फेरीतच होईल. हा सामना १४ जून रोजी खेळवला जाईल. हे दोन्ही संघ आता केवळ आयसीसी किंवा एसीसी स्पर्धांमध्येच आमनेसामने येतात, त्यामुळे या सामन्याची उत्सुकता शिगेला पोहोचलेली आहे.

# बीसीसीआयचा कर्णधारपदाचा प्रस्ताव मी स्वतःच नाकारला -बुमराह

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट संघाचा स्टार वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहने इंग्लंडविरुद्धच्या आगामी पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेपूर्वी एक मोठा खुलासा केला आहे. 'बीसीसीआयकडून भारतीय कसोटी संघाच्या कर्णधारपदाचा प्रस्ताव मिळाला होता, परंतु मी तो स्वतःहून नाकारला,' असे स्पष्ट केले.

वर्कलोड मॅनेजमेंटला प्राधान्य देत आणि संघाच्या हितासाठी हा निर्णय घेतल्याचे बुमराहने सांगितले. यामुळे शुबमन गिलला कसोटी कर्णधारपदाची जबाबदारी देण्यात आली, तर ऋषभ पंतला उपकर्णधार बनवण्यात आले. बुमराहने हा खुलासा



स्काय स्पोर्ट्सवरील माजी भारतीय यष्टिरक्षक-फलंदाज दिनेश कार्तिक यांच्याशी संवाद साधताना केला.

रोहित शर्माने ७ मे रोजी आणि त्यानंतर काही दिवसांनी विराट कोहलीने कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केल्यानंतर भारतीय कसोटी संघाच्या कर्णधारपदासाठी चर्चा सुरू झाली होती. या शर्यतीत बुमराहचे नाव आघाडीवर होते. तो संघाचा उपकर्णधारही होता आणि यापूर्वी त्याने ऑस्ट्रेलिया (२०२४-२५) आणि इंग्लंड (२०२२) यांच्याविरुद्धच्या कसोटी सामन्यांमध्ये संघाचे नेतृत्व केले होते. त्यामुळे अजित आगरकर यांच्या नेतृत्वाखालील निवड समितीने त्याला कर्णधारपदासाठी प्रथम पसंती दिली होती.

बुमराहने आयपीएल २०२५ दरम्यानच बीसीसीआयला आपली भूमिका स्पष्ट केली. त्याने आपल्या पाठीचे दुखणे आणि दीर्घकाळ क्रिकेट खेळण्यासाठी कार्यभार व्यवस्थापनाच्या गरजेमुळे कर्णधारपद स्वीकारण्यास नकार दिला. यामुळे २४ मे रोजी बीसीसीआयने शुबमन गिलला इंग्लंडविरुद्धच्या मालिकेसाठी (२० जूनपासून सुरू) कसोटी कर्णधार म्हणून नियुक्त केले.












दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com